अरसिकेषु कवित्व निवेदनम् । शिरसि मा लिख मा लिख मा लिख

329

# सरसवाङ्मय काव्य-रत्नमाला.

# काव्यरत्न पहिलें.

कविः करोति काव्यानि । लालयत्युत्तमो

तरुः प्रसूते पुष्पाणि । मरुद्वहति सौरभ

REFBK-0001321
REFBK-0001321

कवि—

रा. रा. रावबहादुर,

## पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी,

जे. पी., एफ्. आर. जी. एस्.

प्रकाशक—

तात्या नेमिनाथ पांगळ,

प्रोप्रायटर, सरसवाङ्मयप्रसारक मंडळी,

डॉ. भालचंद्रसमोर, रा. भांडाऱ्यांचा दगडी बंगला, गिरगांव-मुंबई.

मुद्रक,

केशव रावजी गोंधळेकर, ‘ जगद्धितेच्छु ’ प्रेस,

४३२ शनिवार पेठ, पुणें-सिटी.

९ मार्च १९१६.] किंमत पांच आणे. [ आवृत्ति पहि

# प्रकाशकाचे दोन शब्द.

परमेश्वरकृपेनें आज एक वर्षापासून "सरसवाङ्मयप्रसारक मंडळी" मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या "सरसवाङ्मयरत्नमाले" च्या द्वारें ललितवाङ्मयप्रसाराचें कार्य चालू आहे. या वाङ्मयप्रसारांत विविधता असावी अशा अनेक सूचना मागें टाईम्स, क्रॉनिकल प्रभृति पत्रकारांनीं, अनेक विद्वानांनीं आणि आमच्या रसिक वाचकांनींहि केल्यामुळें, आणि पद्यात्मक वाङ्मय हाहि एक साहित्याचा प्रमुख भाग असल्यामुळें—प्रस्तुत आह्मी पद्यात्मक वाङ्मयप्रसारासाठीं ही "सरसवाङ्मयकाव्यरत्नमाला" सुरू करीत आहोंत.

या काव्यरत्नमालेंतून कवींच्या सरस काव्यांनीं अलंकृत झालेलीं व उत्कृष्ट काव्यरसांनीं ओथंबलेलीं अशीं १२ तरी पुस्तकें वर्षास प्रसिद्ध करून तीं सरसवाङ्मयरत्नमालेबरोबरच आमच्या रसिक वाचकवर्गास अत्यल्प मोलांत सादर करावींत असा आमचा हेतु आहे. तरी आमचा हा नूतन प्रयत्न रसिकांना मान्य होवो असें आह्मी इच्छितों.

महाराष्ट्र भाषेंत, भ्रमराप्रमाणें मधुर काव्यरसपान करणारे रसिक वाचक ज्याप्रमाणें अनेक आहेत त्याप्रमाणें अंतःस्फूर्तीनें तो मधुर काव्यरस निर्माण करणारेहि कविवर्य आज अनेक आहेत. याची साक्ष 'शारदाप्रसाद मंडळी मार्फत निघालेलीं काव्यात्मक पुस्तकें, काव्यरत्नावली, वगैरे देत आहेतच; पण महाराष्ट्राच्या किंबहुना हिंदुस्थानच्याहि पलीकडे ज्यांच्या काव्यरसाचा परिमल गेलेला आहे असे कविवर्य फारच थोडे आहेत असें ह्मटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. कारण आपल्या महाराष्ट्रांतील आधुनिक कविवृंदापैकीं, एखाद्या कवीच्या काव्यांतील [illegible] विचार हीं ध्यानांत घेऊन फ्रान्स, अमेरिका वगैरे पाश्चात्य [illegible] पंडितांनीं जर प्रथम प्रशंसापर उद्गार काढले असतील तर ते [illegible]वे रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी यांच्या 'भारतवर्षिणी' व 'परिषदाभिनंदन' या काव्यासंबंधानेंच होत. इ. स. १८८७ मध्यें 'कॉलेज डी फ्रान्स' चे संस्कृत व इतर पौरस्त्य भाषांचे Oriental (Languoges) अध्यापक, प्रो. मॅक्समुल्लरप्रमाणेंच प्रख्यात व २७ भाषांचे ज्ञाते पंडित डार्मस्टेटर हे हिंदुस्थानांतील प्राचीन पेहलवी व संस्कृत लेख

मिळविण्याकरितां जेव्हां मुंबईस आले होते तेव्हां त्यांचें वास्तव्य या शहरीं सुमारें महिनाभर असून ते कांहीं दिवस तत्कालीन गव्हरनर लार्ड रे साहेब यांचे पाहुणेहि होते. त्यांनीं आपल्या प्रवाससंबंधानें 'Lettres Sur l' Inde या नांवाचें फ्रेंच भाषेंत एक पुस्तक लिहिलें असून, ते त्यांनीं लॉर्ड रे साहेबांना अर्पण केलेलें आहे. या पुस्तकांत त्यांनीं रा. ब. जोशी यांच्या 'भारतवर्षिणी' काव्याचा व त्यांतील उदात्त विचारांचा सकौतुक व आदरपूर्वक उल्लेख केलेला असून ते विचार 'भरतखंडांतील तरुण व सुशिक्षित जनतेच्या भावी राष्ट्रीय आकांक्षांचे द्योतक आहेत' असें ध्वनित केलें आहे.

या कवीचें 'परिषदभिनंदन' हें काव्य, अमेरिकेंत शिकॅगो येथें सन १८९४ सालीं भरलेल्या सभेकरितां 'पार्लमेंट आफ रिलिजन्स' चे प्रेसिडेन्ट डॉ. ब्यारोज व सेक्रेटरी मि. विल्यम पाइप यांच्या विनंतीवरून रचिलें असून तें अमेरिकेंतील विद्वानांना अत्यंत आवडलें व त्या काव्याचें इंग्रजी भाषांतर सन १८९४ सालीं 'न्यूयॉर्क इंडिपेंडंट' प्रभृति पत्रांनीं प्रसिद्ध करून त्या काव्याची अत्यंत तारीफहि केली. या काव्यांतील उदात्त विचार तिकडील सभेच्या चालक पंडितांना अत्यंत आवडल्यामुळें त्यांनीं कवि. रा. ब. जोशी यांना, शिकॅगो येथें भरणाऱ्या महासभेच्या परीक्षक कमीटीचे सभासद ( member of the advisory Council ) नेमिलें. ( शिकॅगो येथें मागें जी जंगी सभा भरली होती व जीपुढें स्वामी विवेकानंदप्रभृति विद्वानांचीं भाषणें झालीं ती हीच 'पार्लमेंट ऑफ धी रिलिजस्' होय. ) व अमेरिकेत जाण्यायेण्याबद्दल भाडें देण्याचें मान्य करून कवीस सभेकरितां तिकडे बोलाविलें. त्याचप्रमाणें डॉ. ब्यारोज यांनीं आपल्या "प्रोसिडिंग्ज् ऑफ धी पार्लमेंट ऑफ् रिलिजन्स, शिकॅगो" या पुस्तकांत प्रस्तुत कवीचें, फोटोसह त्रोटक चरित्रहि प्रसिद्ध केलें होतें. परक्याविषयीं अत्यंत आदर बाळगणाऱ्या व गुणगौरव करणाऱ्या अमेरिकन विद्वानांबद्दल कोण बरें धन्योद्गार काढणार नाहीं? हें "परिषदअभिनंदन" काव्य आह्मी या काव्यरत्नांत समाविष्ट केलेलें आहे."

---

१ "Lettres Sur l' Inde" या पुस्तकाचें २० पृष्ठ पहा.

यांवरून या कवींच्या काव्यांतले प्रगल्भ विचार व रम्य कल्पना पाश्चात्य राष्ट्रांतल्या विद्वानांस आवडल्या होत्या असें दिसून येईल.

आपल्याकडेहि कवि चंद्रशेखर गोरे यांनीं मागें "अर्वाचीन कविता" ह्मणून जें पुस्तक प्रसिद्ध केलें त्या पुस्तकांतहि रा. ब. जोशी यांच्या कवितेंतील कांहीं वेंचे दिले असून त्यांनीं "या कवीची कविता प्रौढ व हृदयंगम असते" असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें या कवींच्या निरनिराळ्या काव्याबद्दल, कै. न्यायमूर्ति म. गो. रानडे, प्रो. भागवत, कर्नल कीर्तिकर, सर भालचंद्र, रा. सा. साठे, (माजी रिपोर्टर ऑन दि नेटिव पब्लिकेशन), रा. सा. ओक, रा. सा. कानिटकर प्रभृति अनेक विद्वानांनीं व केसरी, इंदुप्रकाश, सुबोधपत्रिका वगैरे पत्रकारांनीं प्रशंसनीय अभिप्राय दिलेले आहेत.

अशी जरी वस्तुस्थिति आहे तथापि कवींच्या या उत्तम काव्याची महाराष्ट्रांत किंवा अन्यत्र जेवढी प्रसिद्धी व्हावयास पाहिजे तेवढी झालेली नाहीं, हें निर्विवाद आहे. प्रस्तुत कालीं राजनिष्ठापर, स्वदेशप्रीतिविवर्धक, राष्ट्रीयसद्गुणपरिपोषक व अत्यंत बोधप्रद अशा तऱ्हेच्या काव्यांची फार आवश्यकता असल्यामुळें, केवळ प्रेमविषयक काव्यें संपादन करण्याच्या भरीस न पडतां, या कवीची वरील उच्चसद्गुणपरिपोषक अशी कांहीं निवडक काव्यें आह्मी आमच्या या पहिल्या काव्यरत्नांत ग्रथित करीत आहोंत. आह्मी केलेली ही निवड 'सरसा सालंकारा सपदन्यासा' या मार्मिक कव्युक्तीस अनुरूप अशीच झाल्याचें रसिक वाचकांस आढळून येईल अशी आह्मी आशा करतों.

या आमच्या प्रथम काव्यरत्नांत समाविष्ट करण्यास रा. ब. पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी यांनीं आपलीं हीं सरस काव्यें आह्मास दिलीं याबद्दल आह्मी त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

काव्यरत्नप्रसारासाठींच केवळ या काव्यरत्नमालेचा अवतार असल्यामुळें विद्वान् कवी व रसिकवाचकहि या काव्यमालेस आश्रय देतील अशी आशा बाळगून हा प्रास्ताविक लेख संपवितों.

गिरगांव, मुंबई.<br>ता. २५।२।१६.

आपला नम्र,<br>वाल्या नेमिनाथ पांगळ.



# सरसवाङ्मय काव्यरत्न-माला.

## रत्न पहिलें.

१

## राज्याभिषेकोत्सव—गीत. सन १९११.

### ( CORONATION ANTHEM. )

( चाल—सुंदर मुख तुंदिल तनु० )

जयजयजय जॉर्जनृपा भरतभूवरा ॥
इंदिरा न कधीं त्यजो राजमंदिरा ॥ ध्रु० ॥
ज्येष्ठमास विष्णुतिथी श्रेष्ठ ही किती ! ॥
राज्यपदारोहणविधि शास्त्रसंस्कृती ॥
आज घडति, शांत भूति लोक चिंतिती ॥
आंग्लभौम राज्यनीति विबुध वर्णिती ॥
( चाल ) प्रजा उभविती ध्वजा, स्तविति ईश्वरा ॥
करीं चिरायु जॉर्जनृपा भुवनसुंदरा ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ जयजयजय जॉर्जनृपा० ॥

लंदनपुरिं चंदनमय स्यंदनीं किती ॥
वंदनार्थ नंदनार्थ नृपति मिरवती ! ॥
नव-वसुधा-मंत्रि सुधा-वाणि वर्षती ॥
आंग्लनृपा देवकृपा कुशल वांछिती ॥
( चाल ) स्तवुनि मुखें प्रार्थिति जन-संघ ईश्वरा ॥
शांति असो पुष्टि असो जॉर्ज भूवरा ॥ २ ॥
॥ ध्रु० ॥ जयजय० ॥

भरतखंडवासिजनां भेट द्यावया ॥
मार्गशीर्ष पुण्यमास एथ यावया ॥
नियोजिशी प्रियेनिशीं, राजराजया ! ॥
आम्हांवरि लोभ खरा अंतरीं दया ॥
( चाल ) मायबाप बंधुमित्र असासि तूं खरा ॥
भरतखंडवासिजनां थोर आसरा ॥ ३ ॥
॥ ध्रु० ॥ जयजयजय जॉर्जनृपा० ॥

---

२

# मुंबापुरींतील राष्ट्रीय महोत्सव १९१५.

## सर्ग १ ला.

### वृत्त—साकी.

सौंदर्यान्वित समुद्रवेष्टित शोभे मुंबानगरी ।
औदार्यानें जनां भासते अलकावतीच दुसरी ॥ १ ॥

आंग्ल नृपाच्या साम्राज्यांतिल जरि ही नगरी दुसरी ।
सुंदरतेनें नंदन केवळ ! लंदन पावे न सरि ॥२॥
दिला इंदिरावरें मुकुंदें दिधलें वैभव, भारी ।
विद्याज्ञानधनान्वित धार्मिक मुंबाजनता सारी ॥३॥
आतिथ्यानें हर्षित करिते जे जे येती त्यांतें ।
सर्वांसंगें या नगरीचें मित्रत्वाचें नातें ॥४॥
यास्तव येती विविध तऱ्हेचे विविधपुरींचे लोक ।
कुणी रहाया कुणी पहाया पुरविति मनिंचे शोक ॥५॥
राष्ट्रसभा जी जन्म पावली मुंबापुरींत, झाली ।
त्रिंशतिवर्षा, निजमातेला भेट द्यावया आली ॥६॥
राष्ट्रदेवता येते ह्मणुनी हर्षित झाली जनता ।
बालवृद्धजन सर्व हर्षले प्रमुदित झाल्या वनिता ॥७॥
गुढ्या तोरणें ध्वजा पताका उभारिती जन हर्षें ।
राष्ट्रमहोत्सव कार्यीं अवघें जनतामन आकर्षे ॥८॥
स्वयंसेवकांचीं हीं पथकें उत्साही तरुणांचीं ।
पहा तयांच्या प्रभा झळकते वदनीं वीरश्रीची ! ॥९॥
पयोनिधितटीं हेमंताचा अनिल सुशीतल वाहे ।
सभा भराया स्थान मनोहर पसंत केलें आहे ॥१०॥
तिथें उभविले भव्य मनोहर मंडप सुंदर नाना ।
खुर्च्या कोची बहुत मांडिल्या बसण्या श्रोतृजनांना ॥११॥
राष्ट्रसभेच्या पतीकारणें सिंहासनही रचिलें ।
राष्ट्रसिंह हा बघावयाला जनताचित्त भुकेलें ॥१२॥
राष्ट्रसभेला सत्य आवडे सत्यंच पडतें कामीं ।
यास्तव वरिला राष्ट्रसभेनें सत्येंद्र स्वस्वामी ॥१३॥

सत्येंद्रप्रभु प्रसन्न होतां सफल मनोरथ होती ।
राष्ट्रसभेनें यास्तव वरिली सत्यप्रसन्न—मूर्ती ॥१४॥
किंवा वसतो आंग्ल लांछनीं सिंह भयंकर मोठा ।
यास्तव सतिनें सिंह आणिला सांगे दोघां भेटा ॥१५॥
राष्ट्रसभेची सर्व तऱ्हेची झाली पूर्ण तयारी ।
येते ह्मणती सिंहपतीसह राष्ट्रसभेची स्वारी ॥१६॥
दिसेंबराच्या पंचविसाव्या दिवशीं धांदल उडली ।
तऱ्हेतऱ्हेच्या शृंगारांनीं मुंबानगरी नटली ॥१७॥
लाडू जिलब्या तऱ्हेतऱ्हेचीं पक्वानें हालवायी ।
पुढें बांधुनी सदना आणिति शोभा ठायीं ठायीं ॥१८॥
मरुस्थलींचे कृपण जयांतें शिखा शोभती तीन ।
टांगिति लोटे ह्मणति असो श्री जीनप्रभु प्रसन्न! ॥१९॥
कुणी बांधिती गृहा तोरणें ध्वजा पताका कोणी ।
इक्षुदंड वा पूगीफल वा नारळ केळीं वाणी ॥२०॥
सुगंध सुमनीं हरितपल्लवीं मुक्ताफलमालांनीं ।
धनिकजनांनीं मंडित केलीं सदनें हेम नगांनीं ॥२१॥
पौरस्त्री-जन गृहा बांधिती भर्जरि साड्याचोळ्या ।
ह्मणती जय जय करा हरीचा[१] अमुच्या भगिनी भोळ्या ॥२२॥
शनैश्चराचा दिवस पातला गर्दी नगरीं झाली ।
बोरिबंदरीं दहा सहस्रांहून अधिक ती दिसली ॥२३॥
एक वाजतां सिंहपतीसह राष्ट्रदेवता यावी ।
दोन वाजले ! तीन वाजले ! स्वारी कां न दिसावी ॥२४॥
दोन वाजले ! तीन वाजले ! परि दिसेना स्वारी ।
पौर मानसीं चिंता दाटे वाटे व्यर्थ तयारी ॥२५॥

१ श्रीकृष्णाचा किंवा अध्यक्ष सिंह यांचा.

ठोके पडतां चार घड्याळीं आली 'स्पेशल' गाडी ।
स्वयंसेवकीं धांदल उडली जाती सर्व अघाडी ॥२६॥
दीन जनांचा मित्र **दीनशा** मुग्ध जनांची वाचा ।
ज्ञाता नेता पौरजनांचा गेला समोर **वाच्छा** ॥२७॥
**वाच्छा**संगें स्वागत करण्या गेले अन्य पुढारी ।
जय! जय! बोला ह्मणती आली सभापतीची स्वारी ॥२८॥
जय जय जय जय **सत्य सिंहजी!** जय जय करिती लोक ।
दहा सहस्रांहून अधिक ते वृद्ध तरुण लघु तोकं[1] ॥२९॥
रथीं बैसले सत्यसिंहजी राष्ट्रदेवताधिपती ।
मंदगतीनें स्यंदन चाले जन करिताति प्रणती ॥३०॥
जय जय जय जय राष्ट्रदेवते ! विजय प्रसन्न सिंहा ! ।
हिप् हिप् हुर्रे! हुर्रे! हिप् हिप् **सत्यप्रसन्न** ! हां! हां! ॥३१॥
असंख्य ऐसे ध्वनि प्रतिध्वनि निघती असंख्य जागीं ।
धन्य! दिवस हा भारत जनता आज जाहली जागी ॥३२॥
सहस्र वर्षें निद्रित होतें राष्ट्र आमुचें अवघें ।
स्वातंत्र्याचें मोल न कळलें ! कोण तयाची चव घे ? ॥३३॥
स्वातंत्र्याची गोडी आह्मां शिकविलि आंग्लजनांनीं ।
उपकृति त्यांच्या नित्य धराव्या आर्यजनांनीं ध्यानीं ॥३४॥
प्रसन्न झाले सत्यसिंहजी अति नम्रत्वें करिती ।
उभे राहुनी प्रणति बांधवा स्यंदन चाले पुढती ॥३५॥
जागजागच्या राजपथावर येउनि सुंदर वनिता ।
भाळीं कुंकुम तिलक लाविती, टाळी वाजवि जनता ॥३६॥
अन्या ललना प्रसन्नवदना करीं आरत्या घेती ।
प्रसन्नापुढें ओंवाळुनि तत्करीं शर्करा देती ॥३७॥

१ मुलें.

हात जोडुनी नमन करी तो प्रिय भगिनींना भावें ।
नयनीं आनंदाश्रु निघाले ! हृदयीं मोद न मावे ! ॥३८॥
स्यंदहर्स्टच्या[1] राजपथावर जेव्हां स्यंदन आला ।
पौरजनांच्या पुष्पवृष्टिनें रथ तो अवघा भरला ॥३९॥
अशा प्रकारें जयजयकारें राष्ट्रसभेच्या सिंहा ।
नागरिकांनीं पोंचविलें श्री बडोदराधिपति-गेहा[2] ॥४०॥
धन्य ! दिवस हा लोक बोलती धन्य ! ईश्वरी माया ।
पायां हरिच्या नित्य पडावें भक्ति न जाई वांया ॥४१॥
भारतभूची येईल हरिला करुणा यांत न शंका ।
कृपा हरीची जगीं वाजविल भरतयशाचा डंका ॥४२॥
जॉर्जभूपति हरिप्रसादें पुरविल पवित्र आशा ।
चला मित्र ! या पुनः विनवितों चला स्तवूं परमेशा ॥४३॥

---

## सर्ग २ रा.

सोमवारचा दिवस नेमिला सौंसदुत्सवासाठीं ।
दहा वाजतां सभामंडपीं दाटी झाली मोठी ॥१॥
राष्ट्रमहोत्सव पहावयाला आले लोक अनेक ।
कुणी सभासद कुणी पाहुणे कुणी निमंत्रित लोक ॥२॥
होतीं प्रेक्षक लोकांकारितां तिकिटें पांच तऱ्हेचीं ।
तिकिटें घेउनि लोक शोधिती जागा सुख सोईची ॥३॥
" डेलिगेट " जे तयां कारणें थोर पाहुण्याकरितां ।
रंगित वसनाच्छादित सुंदर 'प्लॅटफार्म'ही होता ॥४॥

---

१ सँढर्स्टरोड. २ गायकवाड सरकारचा नेपियन्सीरोडवरील "राजमहाल" प्रासाद.

एक वाजतो न वाजतो तों धांदल फार उडाली ।
सभा मंडपीं गर्दी झाली जागा एक न उरली ॥५॥
उरली सुरली पौर मंडळी कोनकोपरीं शिरली ।
प्रभाकराच्या प्रखर उन्हांतहि उभी राहिली दिसली ॥६॥
स्वागतमंडळ सभासदांतिल मुख्य मुख्य जे असती ।
पहा ! पहा ! हे स्वागत करण्या उत्सुक सारे दिसती ॥७॥
समर्थ ते हे समर्थ झाले करावया ही रचना ।
दोन्ही पक्षीं खरें बोलती खरे दाजिबा नाना ॥८॥
जहांगीर हे देशभक्तिची हृदीं जयांच्या ज्योति ।
सदा प्रकाशे मनीं विकासे भारतजनताप्रीति ॥९॥
चंदावरकर 'नैट' बहादुर इंदुर सोडुन येतां ।
देशभक्तिनें माळ घातली पुनरपि त्यांतें आतां ॥१०॥
यांची वाणी ह्मणती कोणी खाणी इक्षुरसाची ! ।
वाङ्माधुर्ये मोहित करिती, सांगति गोष्ट मजेची ॥११॥
भालचंद्र हे स्वादु बोलती सत्वशीलही भारी ।
चिमणलाल हे, मूर्ति जयांची फिरोजशाला प्यारी॥१२॥
वृद्ध वाडिया क्रुद्ध न दिसती शुद्ध बोलती वाचां[१] ।
वाचा त्यांचें मागिल भाषण नेता यांचा बाच्छा ॥१३॥
भेद नसावा भारतपुत्रीं ऐक्य मुक्तिचा जीनां[२] ।
कंठरवानें कथिति जनांतें ब्यारिस्टर हे जीना ॥१४॥
राष्ट्रदेविची उपासना जे व्रत नियमांनीं करिती ।
उपासनी हे सत्य बोलण्या कधीं न चित्तीं भीती ॥१५॥
परा भक्तिनें सदा जपति जे विद्यार्थ्यांच्या विहितीं[३] ।
गणितशास्त्रपटु परांजपे हे विदुषी ज्यांची कांता ॥१६॥

१ वाणी. २ सोपान. ३ कल्याणासाठीं.

महाराष्ट्रकवि कानिटकर हे शोभति सौजन्यानें ।
रसिकमनांचे रंजन करिती काव्यसुधारस दानें ॥१७॥
व्रजजिवनसुत[1] धर्मनिष्ठ हे त्रिभुवनदास हरीचे ।
नगरश्रेष्ठी म्हणति जन जयां मंदिर भूतदयेचें ॥१८॥
विद्यापीठीं लक्ष ठेउनी लक्ष[2] मुद्रिका ज्यानें ।
दिधल्या ते हे भक्त नरोत्तम शोभति दाक्षिण्यानें ॥१९॥
विनयशील हे जोशी[3] इथले फार जुने रहिवासी ।
पंडिताख्य हे राजगुरु पहा राजे मानिति ज्यासी ॥२०॥
धारवाडचे कॉलेजास्तव रोद्द खुद्द हे झटती ।
वृद्ध जरि तरी दिसे तरतरी आंगीं मोठी शक्ती ॥२१॥
आले होते स्वजन बघाया राष्ट्रदेवताभवनीं ।
ऐक्य बांधवीं, भेद पाहतां खेद पावले स्वमनीं ॥२२॥
महोत्सवाचे चालक दिसले, पालक नव्या व्रताचे ।
लोकमान्यवर तिलक न दिसले रुसले मित्र तयांचे ॥२३॥
मला वाटतें भेद नसावा सकळीं व्हावें मित्र ।
राष्ट्रसभेचें क्षेत्र असावें मत्सरहीन पवित्र ॥२४॥
राष्ट्रदेवताहितार्थ सकळीं व्रत नियमां पाळावें ।
आचरिती जे नियम तयांतें 'मुक्तद्वार' असावें ॥२५॥
वंगमहीचे पंजाबाचे मद्रदेशचे असती ।
चला बघुं हे थोर पाहुणे कोण कुठे ते बसती ॥२६॥
मुस्लिमसंघाधिपति पहा हे नामें मझरूल हक्क ।
मुस्लिम-हिंदू बंधु परस्पर दोघां हक्क समान ॥२७॥

---

१ वरजीवन दास यांचे पुत्र. २ एक लाख रुपये. ३ रावबहादूर विनायक सदानंद जोशी.

राजमान्य हे चौबळ दिसती श्रेष्ठ प्रेक्षकवृंदीं ।
तिथें पट्टणी भावनगरचे सचिव सुधी आनंदी ॥२८॥
सुब्बराव सेनान मद्रचे चौधरि वंगमहींचे ।
भृत्यु[1]चमूचे शास्त्री चिंतामणि हे प्रयागपुरचे ॥२९॥
मध्य देशाचे मुधोळकर हे जोशी[2]–सुधारणांचे ।
पलीकडे जे विद्यामंडित पंडित नागपुराचे ॥३०॥
टाळ्या वाजति आनंदाच्या लोक तिथें कां उठले ।
भारतभूसत्पुत्रशिरोमणि कोण पाहुणे आले ॥३१॥
नभो मंडळीं जसा रवि तसा सभा मंडळी शोभे ।
पंडित मदन सुमोहन ज्याचें वित्तीं चित्त न लोभे ॥३२॥
टाळ्या वाजति पुनः पुनः कां ? कोण पातले ? पाहूं ।
संतजनाच्या पदीं प्रीतिनें प्रणाम सुमनें वाहूं ॥३३॥
बसंतिका[3]ही पसंत करिते भारत-धर्म पुराणें ।
वाक्चातुर्यें कुंठित करि जी असंख्य पंडित राणे ॥३४॥
आयर्लंड[4]ची दुहिता असुनी आर्यभूमिच्या विहिता ।
निजदुहितेसम झटे, वानिते यास्तव हिजला जनता ॥३५॥
टाळ्या वाजति पहा कोण ही? दिसते साधी भोळी ।
सुंदर वदनीं सुहास्य शोभे अंगीं साधी चोळी ॥३६॥
वंगसुता ही सभा प्रसंगीं रंग भाषणीं आणी ।
आंग्लजनांसहि दंग करितसे हिची अभंगा वाणी ॥३७॥
हिंदशारदा हिला बोलती सरोजिनी कवयित्री ।
जन्म पावतां सरस्वतीनें सुधा ओतिली वक्त्रीं ! ॥३८॥

---

१ सर्वंट्स् ऑफ इंडिया. २ उमरावतीचे मोरोपंत जोशी. ३ बिझांटबाई
४ आयर्लंड

भारतभूचे प्रसिद्ध वक्ते नेते वंगजनांचे ।
येति पहा हे सुरेंद्रबाबू स्नेही दीनजनांचे ॥३९॥
एक वाजला धांदल झाली उभे राहिले सारे ।
आले! आले! सभाधिपति हे! हिप् हिप् हुर्रे हुर्रे!!! ४०
जय जय जय जय! सत्यसिंहजी गर्जति लोक मुखानें ।
दुजे दाविती हर्ष मनांतिल करतालिकाध्वनीनें ॥४१॥
प्रणाम करुनी सर्व बांधवां सिंह आसनीं बसले ।
त्यांच्यासंगें वाच्छा आले दोघे प्रसन्न दिसले ॥४२॥
"हिंद हमारा देश" गीत हें मंजुळ सुस्वर गाती ।
भारतभूच्या सुंदर दुहिता श्रोते शांती वरिती ॥४३॥
स्वागत मंडळतर्फें उठले स्वागतकरण्या वाचा ।
आभारी मी फार आपुला वर्णूं शकें न वाचा ॥४४॥
होती ज्याची स्वागत करण्या मधुरसुधेसम वाचा ।
वाचस्पति तो मधुरगिरेचा गेला! सिंह पुरीचा ॥४५॥
मेथा नेता या नगरीचा हंत! अंतकें नेला!।!
असें बोलतां कंठ दाटला! स्राव लोचनीं झाला!! ॥४६॥
दुःखोत्कर्षें न बोलवे मज दृष्टिहि झाली मंद ।
मत्सुत भाषण वाचिल माझें क्षमा करो! जनवृंद ॥४७॥
तनयतयाचा वाची भाषण कथितों संक्षेपानें ।
"एकामागून एक चोरिले तीन हिरे काळानें ॥४८॥
दुजे गोखले, मेथा, कॉटन मिळणें दुर्घट भारी ।
उपकृति त्यांच्या स्मरते प्रेमें भारतजनता सारी" ॥४९॥
"प्रतीचीकडे युद्ध भयंकर चाले, आंग्लजनांतें ।
साह्य करावें सर्व तऱ्हेनें वाटे भारतभूतें ॥५०॥

भारतभूच्या स्वयंसैनिकां परी मिळेना स्थान ।
सेवा करण्या साम्राज्याची, वाटे हा अपमान!!" ॥५१॥
अशा तऱ्हेचें भाषण वाचुन जहांगीरजी बसले ।
चिमणलालजी [१]सीतलवड मग बोलायाला उठले ॥५२॥
चिमणलालजी म्हणे 'आजच्या सभापतीचें स्थान ।
मंडित करुनी सर सिंहांनीं द्यावा स्वजनां मान " ॥५३॥

आर्या-गीति.

अनुमति द्याया उठले वाचस्पति दोन देशभक्त हिरे ।
दुमदुमली सर्व सभा, जयशब्दें हस्ततालिकागजरें ॥५४॥
बोले सुरेंद्र माझे असती सत्यप्रसन्न मित्र जुने ।
करितिल वाङ्माधुर्यें श्रोतृजनांचीं इथें प्रसन्न मनें ॥५५॥
पंडित[२] सत्येंद्राच्या स्वार्थत्यागास फार वाखाणी ।
[३]सचिवपद स्वीकारुन जानपदीं सिंह पात्रता आणी ॥५६॥
उठले राष्ट्रसभेचे अधिपति भाषण करावया आपुलें ।
टाळयांच्या गजरांनीं राष्ट्रसभास्थान हर्षलें, घुमलें! ॥५७॥
राष्ट्रसभापति बोले, "आहें मी फार फार आभारी ।
स्वागत अपूर्व ऐसें, अनुभविलें म्यां कधीं न संसारीं॥५८॥
मान अनंत मिळाले, परि हा आहे वरिष्ठ सर्वांत ।
राष्ट्रसभाध्यक्षाचा, मान न विसरेन मी स्वजन्मांत ॥५९॥
"हार प्रथम समर्पूं, राजपदीं राजभक्ति सुमनांचा ।
देवापाशीं मागूं, विजय सदा संगरीं नृपाळाचा ॥६०॥
धारातीर्थीं अर्पुन, अपुल्या प्राणांस भारतीय जनीं ।
अप्रतिम राजनिष्ठा, दाखविली वर्णिली रणीं विजनीं॥६१॥

१ सेटलवाड. २ पंडित मदनमोहन मालवीय. ३ व्हायुसरॉयचे कौंसिल मधील लॉ मेंबरची जागा.

झाले महापुरुष ह्या जगतीं अनेक।
वाशिंग्तनासम तयांत न थोर एक ॥
तद्देशबांधव तुह्मी तुमचें सुभाग्य।
वर्णावयासहि असें बहु मी अयोग्य ॥ ६ ॥

दासत्व गोड अमृतासम ज्यांस वाटे।
देशाभिमानरति यद्हृदयीं न दाटे ॥
स्वप्नांत ऐक्यरुचि ज्यांस नसे मिळाली।
विद्याकलाधन जयां त्यजुनी पळालीं! ॥ ७ ॥

धर्मैक्य टाकुन जयीं बहु धर्मभेद।
केले, निरंतर तसेच वितंडवाद ॥
जे वाढवीति बहु धर्ममिषें जनांतीं।
झाल्या जयांत लघु थोर असंख्य जाती ॥ ८ ॥

सोडून विश्वपरिपालक एक देव।
जे पूजिती अमित देव धरून भाव ॥
ते भारतस्थजन, बांधव मी तयांचा।
कर्मावरी भरंवसा अति फार ज्यांचा ॥ ९ ॥

ऐसें असून मग मी करण्या तुह्मांतें।
धर्मोपदेश नयकोविदधार्मिकांतें ॥
कैसा धजेन? मज कां लव लाज नाहीं।
कैसें हसूं मग नये? मजला जनांहीं ॥ १० ॥

तत्रापि मान्य करुनी तुमची विनंती।
अत्यादरें निजमनीं प्रियबंधुभक्ती ॥
ठेवून मी कथितसें विनयें तुह्मांतें।
हे दोन शब्द नयकोविदबांधवांतें ॥ ११ ॥

झालें भारतखंड आज जरि हें सर्वोपरी धाकुटें ।
झाले धर्मविचार ह्यांत जितुके तैसें न झालें कुठें ॥
झाल्या धर्मसभा असंख्य इकडे धर्मांवरी पुस्तकें ।
झालीं फार पुरा विवाद ऋषिंनीं केले महा कौतुकें ॥ १२ ॥

झाले वादविवाद फार इकडे त्यांच्यामुळें फायदे ।
झाले भारतभूमिकेस, न सुधी कोणीहि ऐसें वदे ॥
धर्माच्या विषयीं विवाद करणें वाटे न मातें भलें ।
सर्वांला गमतो स्वधर्म बरवा जें आपुलें चांगलें ॥ १३ ॥

हिंदूला गमतें जगांत न दुजें वेदापरी चांगलें ।
ख्रिस्ती बोलति ईश्वरेंच अपुलें सच्छास्त्र आह्मां दिलें ॥
वाटे त्या यवनां पुराण न दुजें त्यांच्या कुराणाविना ।
अग्न्यर्चा अति पुण्यदायक गमे त्या पारसीकां जनां॥ १४॥

ख्रिस्ती ते म्हणती जगास न दुजें येशूविना तारण ।
देवाचा सुपवित्र पुत्र करितो दुष्पापसंक्षालन ॥
तैसी सद्गुरुवांचुनी म्हणति ते हिंदू न मुक्ती मिळे ।
लागा तच्चरणीं तरीच तुमची दुष्पापबाधा टळे ॥ १५ ॥

ज्यानें सर्व जगास ह्या विरचिलें शोधावया त्याजला ।
जाणें दूर नको असे सकळिकांच्या तो हृदीं स्थापिला ॥
त्याचें ध्यान करावयास न लगे मध्यस्थ कोणी दुजा ।
रावापासुन रंकही करुं शके त्याची सुभावें पुजा ॥ १६ ॥

हिंदू, पारसि, जैन, चीन अवघे ज्याचीं असों लेंकुरें ।
राहों ह्या जगतीं सुखें सकळही ज्याच्या कृपा-पाझरें ॥
ध्यावें त्या सदयास कां न सकळीं सोडूनियां मत्सरा ?।
स्थापावी नच कां अशी सुपरिषद् सर्वां जिथें आसरा ?॥ १७॥

हें सत्कार्य करावयास दिसते तुह्मांविना योग्यता ।
राष्ट्रांतें दुसऱ्या न अल्पहि खरी तुह्माकडे सिद्धता ॥
आहे सर्व, करा प्रयत्न करण्या धर्मैक्य ह्या भूतलीं ।
स्थापूनी नव[1]भूमिकेंत परिषद् सद्बोधिनी चांगली ॥ १८ ॥
स्वार्थार्थ सत्ता परक्या जनांची । हरून जीं वाढविती स्वतःची ॥
राष्ट्रें न तीं पात्र करावयातें । सुबोध धर्मीं इतरां जनांतें ॥ १९ ॥
लक्षावधि सैनिक बाळगूनी । साऱ्या जगाची करितात हानी ॥
राष्ट्रें न तीं पात्र करावयातें । सुबोध धर्मीं इतरां जनांतें ॥२०॥
स्वातंत्र्याची सुमाता अभिनव वसुधा पूण्यभू स्वर्णदात्री ।
दासत्वाचीं पहातां तटतट तुटती बंधनें जीस नेत्रीं ॥
सर्वस्वीं तीच आहे सुरुचिर तुमची भूमिका पात्र द्याया ।
दीक्षा सद्धर्ममार्गी, सकलहि जगतीं शांतता वाढवाया ॥ २१ ॥
सर्वेश होऊन तुह्मां प्रसन्न । सिद्धीस नेवो तुमचे प्रयत्न ॥
ज्यांचा झिजे देह परोपकारीं । सदा तयां ईश्वर साह्यकारी ॥२२॥
वैधव्य-दावानल-दग्ध-गात्रा । मुग्धा सदाचारवती पवित्रा ॥
अनाश्रिता भारतभूमि-बाळा । अनंत दुःखें क्रमितात काळा ॥२३॥
दयार्द्र होऊन तुह्मीं तयांतें । द्यावें त्वरें उत्तम आश्रयातें ॥
असें जनांतें करुण स्वरानें । विज्ञापिलें त्या विदुषीस्वसेनें ॥२४॥
ऐकून वार्ता भगिनीजनांची । वैधव्य-दावानल-पीडितांची ॥
दयार्द्र चित्तें नवभूजनाचीं । झालीं, न तैसीं निज बांधवांचीं! ॥२५॥
स्थापूनियां भारतभूमिमाजी तें शारदा[3]मंदिर सत्समाजीं ॥
युष्मज्जनीं मेळविलें यशातें । वर्णु किती मी तुमच्या कृतींतें ॥२६॥

---

१ अमेरिकेंत. २ पं. रमाबाईची विधवा विषयक अमेरिकेंतील कामगिरी. ३ केडगांवचे शारदासदन.

सदा असा क्षोभ अखंड ठेवा! । शुक्लेंदुवत् वाढत नित्य जावा! ॥
क्षमा दया सत्य वसे जयांच्या। चित्तीं कुणा स्नेह नको तयांचा? २७
निःसत्व निष्कांचन आज झालों । अज्ञानसिंधूंत पुरे बुडालों ! ॥
कळे न आह्मां हितही स्वतःचें । गातों पवाडे जरि पूर्वजांचे! ॥२८॥
पुरा जिला बोलति कांचनांची । मही असंख्यात महारथींची ॥
मिळे तिथें आयसही न आतां । जनांस दारिद्र्य गिळी समस्तां! २९
धर्मैक्यता कार्मिक चार वर्ण । होते जिथें शुद्ध जसें सुवर्ण ॥
झाल्या तिथें आज असंख्य जाती! । सांगू किती धर्ममतें तुह्मां तीं? ३०
अज्ञानसारें अमुचें हराया । पाजून विद्यामृत रंकरायां ॥
प्रयत्न येथें करिती सुखानें । कित्येक इंग्रेज उदारधीनें ॥३१॥
तसाचि तो **भारतभूपरत्न** । राजा **सयाजी** करितो प्रयत्न ॥
स्वराजधानींत सुखी कराया । पाजून विद्यामृत रंकरायां ॥३२॥
थोडे बहू तेविं अह्मांत अन्य । प्रयत्न मोदें करिती वदान्य ॥
परंतु अज्ञानमहोदधीला । करावया दूर न शक्ति त्यांला ॥३३॥
ह्मणून झालों अवघे उदास । धरूं कुणाची अवनार्थ कास ॥
कळे न, हें ह्यास्तव सज्जनांतें । प्रार्थीतसों सर्व उदारधींतें ॥३४॥
तुह्मी असां सर्व कलांत भारी । निष्णात! तैसेचि परोपकारी ॥
अज्ञानसिंधूस हरावयातें । उपाय सांगा आमुच्या जनांतें ॥ ३५ ॥

देती जे बुडत्यास हात समयीं एका दुजातें तरी ।
त्यांतें पुण्य घडे, विशेष घडतें पांचां दहांतें तरी ॥
देती जे समयीं; परंतु बुडत्या राष्ट्रास जे काढिती ।
अज्ञानोदधितून नैव दिसते पुण्यास त्यांच्या मिती ! ॥३६॥
भेदाभेद टळो! सुहृज्जन वळो! सन्न्यायमार्गीं, जळो ! ।
बंधुद्रोह, समूळ दूर अवघी मात्सर्यबाधा पळो !॥

१ लोखंड

लोकीं बंधुजनांस नित्य अपुलें कर्तव्य सारें कळो ।
सत्कार्यीं तुमच्या सभेस सुयश श्रीश प्रसादें मिळो ! ॥ ३७ ॥

---

# ४
# परिषदत्प्रहसन.

जातीजातींतील भिन्नभिन्न सभांनीं व परिषदांनीं आपल्या समाजाचें कितपत हित झालें असेल किंवा होण्याचा संभव आहे ह्याची यथार्थ कल्पना ह्या परिषदांच्या ( व कित्येक प्रसंगीं परस्परविरोधी अशा जाति-परिषदांच्या ) चालकांसच करितां येईल. इतरांस ह्या जातिप्रेमबिवर्धक सभा राष्ट्रैक्यप्रेमविवर्धनास विघातक होतील अशी भीति वाटते. जाती-जातींतील परिषदा, विद्याभिवृद्धीसाठीं किंवा पोटभेदांच्या एकीकरणासाठीं असतील तर, त्या नियमित मर्यादेनें स्तुतीस पात्र आहेत. पण ह्या विशिष्ट जातिप्रेमोदधीस भरती येऊन त्याचें अतिक्रमण झाल्यानें देशाच्या प्रगतीस कसे अपाय घडतात ह्याचीं उदाहरणें वारंवार आपल्या अवलोकनांत येतात. ता. ७ मार्च सन १९११ च्या 'इंदूत' धुळें म्युनिसिपालिटीच्या सभासदांची निवडणूक या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. हा लेख वरील सिद्धांताची यथार्थता दर्शवितो. त्यांतील कांहीं भाग असा आहे!—"गांवाच्या विभागाबरोबर **जातवार** अनेक विभाग झाले. आपल्याच वार्डांतील ( आपल्याच जातीचा ) इसम निवडून आणावा असा अभिमान दिसूं लागला. मराठ्यावर मराठा, ब्राह्मणावर ब्राह्मण, न्हाव्यावर न्हावी, ऋग्वेद्यावर ऋग्वेदी, मारवाड्यावर मारवाडी असे प्रत्येक जातीचे लोक आपापल्या जातीवर हक्क सांगूं लागले." ता. ६ जूनच्या केसरींत माळी परिषदेसंबंधानें एक माळी गृहस्थ लिहितात "...त्या परिषदेचे अध्यक्ष सत्यसमाजाचे अभिमानी आहेत. या बैठकीनंतर पुण्यास सत्यशोधक समाजाची सभा होऊन तींत ब्राह्मण वगैरेंची निंदा करण्यांत

आली. हल्लीं सर्व जाती व समाज आपआपली उन्नति करूं लागले आहेत ही गोष्ट चांगली आहे; पण हिचें पर्यवसान जातीजातींत वितुष्टें माजविण्याकडे होईल तर ती गोष्ट समाजास अपायकारक होईल." अशी स्थिति होऊं नये व विशिष्ट जातिभक्तीपेक्षां राष्ट्रैक्यास आधारभूत अशी राष्ट्रभक्ति आपल्या समाजांत जागृत व्हावी, ह्या उदात्त हेतूनें हें पद्यात्मक प्रहसन लिहिलें आहे.

## पूर्वार्ध.

( पृथ्वी छंद. )

चला परिषदा भरा विविध जातिंच्या, पर्वणी ।
असे परिषदांस ही, द्विजगणीं जशी श्रावणी ॥
शरत्समय लागतां भरति दर्दुरांच्या सभा ।
महत्त्व किति त्यांस ये, कळतसे न हें रासभा ॥ १ ॥
दिवा-रजनिला सभा भरिति कूपमंडूक ते ।
स्वजातिपरिषद्विना जन न कूपमंडूक ते ।
सुपात्र, ह्मणुनी सदा परिषदा भरा बोलवा ।
स्वजातिमधल्या जनां कट करा तटां चालवा ॥ २ ॥
चला परिषदा भरा परिषदा कशा कारणें ।
स्वजातिविहितार्थ, यास्तव जनीं जहालीं रणें ॥
चला परिषदा भरा. परिषदा भराव्या कुणीं ।
स्वजातिमधल्या जनीं भरति का सभा मत्कुणीं॥ ३ ॥
स्वजातिजन मेळवा मग दुही करा बोलवा ।
तटांस अपुल्या मठांसहि करीं सुखें खेळवा ॥
रुचेल तरि मान द्या मठपतीस किंवा त्यजा ।
मठाधिप तिच्या मतां उभवुनी स्वतःची ध्वजा ॥ ४ ॥

हरिद्वारीं वारी सज्जनक करीं पंढरपुरीं ।
क्षुरीची ही सारी हकिगत खरी, तूर्त अपुरी ॥ १६ ॥
सभा जेथें तेथें भरति, परिषद् नापित जनीं ।
भरीना कां कोणी? रत सतत मी देवभजनीं ॥
कथा ऐशा सांगे बहुविध तयांतें न गणती ।
दिवाकीर्तीं मुण्डी असति कवि हें सत्य ह्मणती ॥ १७ ॥
कलालपरिषद् भरा तिजसि नांव द्या शौण्डकी ।
कलालमुखिं तीर्थ दे तदिव दे न ती गण्डकी ॥
कलाल असती स्वयें मधुरमण्डहारी[१] वरें ।
तयांस म्हणणें दिसे मज न भण्डहारी बरें ॥ १८ ॥
कलाल महिमा असे विदित मुंबईपत्तनीं ।
जनांस, बहुशूर हे निजजनार्यधःपातनीं[२] ॥
तयांस बघतां पुरा यवनधैर्य सारें गळे ।
ह्मणून म्हणती इथें जन तयांस "हे भोंगळे" ॥ १९ ॥
अनेकविध भेद जे असति वैश्यज्ञातींतले ।
स्मरा निखिल बोलवा मग पृथक् पृथक् आपुले ॥
सभाहि तितुक्या भरा मतविभिन्नता दाखवा ।
कलिप्रिय जनांस या कलियुगीं मिळे वाहवा ॥ २० ॥
चला परिषदा भरा सकल लिंगवंताप्रती ।
निमंत्रण करा करूं शिव--महोत्सवा संप्रती ॥
नसे त्रिभुवनीं खरा इतर पंथ शैवाविना ।
वरिष्ठ शिवही नसे अहह ! वैष्णवी कल्पना ॥ २१ ॥

---

१ भवानीनें कलालास वर दिला आहे अशी आख्यायिका आहे.
२ निजजन+अरि+अधःपातनीं=स्वजनांच्या शत्रूचा पराभव करण्याच्या कामीं.

चला परिषदा भरा सकल वैष्णवां बोलवा ।
शिवाहुनि किती असे हरि वसिष्ठ हें जाणवा ॥
पुराण तितुके स्मरा विविध भेद जे वैष्णवीं ।
सभाहि तितुक्या भरा न विसरा मतें जीं नवीं ॥ २२ ॥
चला परिषदा भरा सकल जैनपंथ स्मरा ।
दिगंबर सभा भरा नवपुरांत[1] शुभ्रांबरा ॥
पुण्यांत अथवा वटोदरपुरांत न्या वाढवा ।
जनीं मतविचित्रता, जिनयती जनीं पाठवा ॥ २३ ॥
मराठे शब्दाचा करुनि नवखा अर्थ दुसरा ! ।
मराठ्यांची संसद् त्वरित भरुं जातांच दसरा ॥
सयाजीही राजी नृपति अपुला त्या वटपुरीं ।
चला चाऊं राहूं नृपनिकट खाऊं क्षिरपुरी ॥ २४ ॥
विलासी लक्ष्मींच्या पहुडुनि करूं मोद अवघे ।
महाराष्ट्रीं मोठे नरपति मराठेच 'चवघे'[2] ॥
करी गीता तो श्रीपति हरि न का यादव खरा ? ।
द्विजीं विद्वत्तेचा फुकट दिसतो सर्व नखरा ! ॥ २५ ॥
सभा भरुनि अंत्यजीं तिजसि सोमवंशी ह्मणा ।
निमंत्रण करा तिथें सकल तीर्थिंच्या ब्राह्मणां ॥
महार असती धनी भरतभूमिकेचे जुने ।
तयांविण न सेविती प्रखर दैवतें पूजनें ॥ २६ ॥
न धेडपरिषद् पुढें भरविण्यास मागें सरा ।
परस्थजनमंदिरीं मिळतसे तयां आसरा ॥
शिवाल न जरी तयां सुरत लालयां राग ये ।
गयेसम विशुद्ध यद्वसन त्यां शिवूं कां नये ? ॥ २७ ॥

१ नवागनगर. २ गायकवाड, शिंदे, होळकर आणि कोल्हापुरकर.

चमारपरिषद् भरा; उपकृती तयांची किती !
उपानह करूनियां तपनताप ते वारिती ! ॥
जयांत निपजे पुरा भजक रोहिदासासम ।
क्षणीं निरसिला जयें कविकबीरचित्तभ्रम ॥ २८ ॥
“ वसे या चर्माच्या नरतनुमधें देव जरि तो ।
न कां या चर्माच्या नरहरि सुमूर्तींत मग तो !॥
वसावा ? भावाचा नरहरि भुकेला त्रिभुवनीं ।
वसे गाती ध्याती भजति जिकडे भक्तभुवनीं ” ॥ २९ ॥
कबीराला ऐसा विशद करुनी धर्म शिकवी ।
स्तवी आर्याछंदीं नमुनि चरणां ज्यास सुकवी ॥
हरी ज्याच्या हस्तें बहुविध चमत्कार करवी ।
नका त्या संताची बुधजन वदा जात बरवी ॥ ३० ॥

---

## उत्तरार्ध.

जिथें जावें तेथें भरिति भरवीती परिषदा ।
स्वतःच्या जातींच्या भरतजनराष्ट्रैक्यभयदा ॥
जिथें जावें तेथें अशुभ दिसतें भेदजनन ।
सभा जातींच्या ह्या करिति न कसें ऐक्यहनन ? ॥ १ ॥
उमेशानें[1] ह्यूमें[2] नवरुजिसुतें[3] राष्ट्रघटनीं ।
महायत्नें रत्नें भरतमहिचीं एकवटुनी ॥
सभा केली झाली सकल निजबंध्वैक्यजननी ।
तिची आशा ऐशी सफल न दिसे द्वैतजननीं ॥ २ ॥

---

१ उमेशचंद्र बानर्जी. २ ह्यूम. ३ दादाभाई नौरोजी.

स्वजातिमधल्या सभा भरविल्या भल्या चांगल्या ।
स्वजातिमधल्या जनां जरिहि गोड त्या लागल्या ॥
तथापि कविला गमे जनपदैक्यसंवर्धनीं ।
स्वजातिमधल्या सभा प्रगतिकार्यविध्वंसिनी ॥ ३ ॥

स्वजातिहितभावना जर दुणावली सज्जनीं ।
स्वदेशहितकल्पना मग न वाढ घे तन्मनीं ॥
स्वजातिभजकां सुधी ह्मणति कूपमंडूक ते !
रमेश न रमे तिथें नच सुपात्र ते मुक्तितें ॥ ४ ॥

स्वजातिपरिषद् भरा ह्मणुनि सांगती जे जनां ।
अपाय करितात ते जनपदैक्यसंवर्धना ॥
अभेदमहिमा अहा ! विसरती शहाणे कसे ! ।
स्वजातिपरिपोषणप्रकृतिधर्म ते काकसे ! ॥ ५ ॥

जरी स्वजन ! ती तुह्मां सुखद एकराष्ट्रीयता ।
हवी तरि करा कमी विविधजातिंची भिन्नता ॥
सभा प्रतिसभा तुह्मी भरवितां कशाला ? दुही ।
करून किति कष्टली अहह ! आपुली ही मही ! ॥ ६ ॥

स्वजातिविषयीं मनीं प्रखर भक्ति जी ठेवितां ।
तिच्या शतगुणीं गणा सुखद एकराष्ट्रीयता ॥
कुलासहि सुधी त्यजी जरि सुखावतो ग्राम, वा ।
हितीं जनपदाचिया त्यजुनि गांव घे वाहवा ॥ ७ ॥

प्रगटलि पहिल्यानें भेदमाया अविंधीं ।
कलिभजनरतांहीं पाहिली हीच संधी ॥
भरुनि परिषदांतें जांतिंच्या वाढवाया ।
कलह, भरतभूची वैरिणी भेदमाया ! ॥ ८ ॥

जेथें भेद कळी बळी घडतसे त्या त्या स्थळीं मंडळी ।
लोकांची दुफळी, विळीच जणुं ती ऐक्यास कापी मुळीं ॥
पोळी तेथ पिके कलिप्रियजनां चाले कुचाळी खुळी।
पाळी ये परुषाक्षरास पहिली तंव्यास ती वेगळी ॥ ९ ॥

कलह करुनि केले भेद बंधूजनांत ।
नुमजुनि किती झाल्या पोटजाती अनंत ॥
भरुनि परिषदा जे जातिभेदांस देती ।
अनुचित महती ते नेणती देशभक्ति ! ॥ १० ॥

मनीं मानिती जातिला देवता जे ।
स्वजातीमधें तेच शोभोत राजे ॥
जयांच्या मनीं देशभक्ती विराजे ।
जगीं थोर ते धन्यता त्यांस साजे ॥ ११ ॥

ही मज्जन्ममही स्वदेशवसुधा ही मद्धरा माउली ।
होवो मंगल आंग्लभूजननिचें आंग्लांस ही साउली ॥
ऐसें आंग्लकवी न काय कथितो? आम्हां न का शिक्षिती ?
दीक्षा देशहितीं ? असो प्रिय न कां आह्मां महीभारती? १२

मानी जाति किती शिवाजि नृपती ? सारेच हिंदू गणी ।
तो तद्बंधु न काय ? भेद करितो शूद्रीं द्विजीं ब्राह्मणीं ? ॥
विद्येचें करुनी निमित्त भरल्या जातींत त्यांनें सभा ।
पूर्वीं काय ? कुठें ? विभूति असल्या भूमंडळीं दुर्लभा ? १३॥

सयाजी कां राजी नृपति भरवाया परिषदा ।
भरूं दे कां मोदें निजनगरिं त्या भेदभयदा ?
जया मानीं मानी भरत वसुधा थोर सुमती ।
नका वाली व्याली स्वजनसमतेचा वसुमती ॥ १४ ॥

स्वजातींच्या झाल्या प्रिय जरि तुह्मांतें परिषदा ।
विसंबावें भावें स्वजन तरि हें गुह्य न कदा ॥
असे आर्यांची ही भरतवसुधा आद्यजननी ।
परेशाची हीची क्षणभर नसो विस्मृति मनीं ॥ १५ ॥
मिळा या मागाया निजपरजनीं मान ‘ सरकी ’ ।
परेशाची सेवा त्यजुनि करिती भक्ति परकी ॥
न ते मोठें जातीहुनि अधिक ज्यां जन्मधरणी[1] ।
सदा राहो त्यांच्या प्रणति कविची पुण्य चरणीं ॥ १६ ॥
जातीकडे न बघती न कलत्र पुत्रीं ।
वित्तीं न गुंतति तसे न सुखीं परत्रीं ॥
जे भारतीय वसुधा विहितैक काम ।
ते ‘ आर्यभूतिलक ’ त्यांस सदा प्रणाम ॥ १७ ॥
जळो ! वाणी वर्णी जननमहितें जी न वदनीं !।
जळो ! तद्-सद्विद्या प्रियतम न ज्यांतें स्वजननी ॥
जळो ! ज्ञातिप्रीती विसरति जिथें जन्मविषया ।
जळो ! ख्याती ध्याती बुधजन जिथें ग्राम्यविषया ॥ १८ ॥
मला निंदा वंदा अवगुण जगाचे मम शिरीं ।
सुखें घाला बोला परुषवचनेंही तदुपरी ॥
नसे चिंता चित्ता उचित गमलें तेंच कथिलें ।
शिरीं घेतां गंगा विषभय भवाचें विशमलें ॥ १९ ॥
माझी ही प्रणती करून विनती आहे स्वबंधूप्रती ।
देशाची प्रगती हवी तरि वरा राष्ट्रैक्यता संप्रती ॥
चातुर्वर्ण्य पवित्र थोर गणुनी सर्वांस बंधु ह्मणा ।
वाढो ! प्रेम जनांत माधव करो चित्तांत ही प्रेरणा ॥ २० ॥

१ जन्मभूमि.

सोडा ! भेद असंख्य जे करिति या राष्ट्रास निःसत्त्व ते ।
जातींच्या भरितां पृथक् परिषदा राष्ट्रैक्यता भंगते ॥
ठेवा ! नित्य रहस्य हें स्वहृदयीं सेवा सुराष्ट्रीयता ॥
देवातें करुणा न येइल कशी आर्यांस सत्पात्रता ॥ २१ ॥
ऐसा येईल काल आर्यवसुधा जन्मेल पुत्रांसही ।
ज्यांच्या सत्कृतिंनीं जगीं प्रमुखता पावेल अस्मन्मही ॥
ही सद्बोधपरा कवित्वरचना वाटेल त्यांतें भली ।
नाहीं प्राकृत लोक गौरवगुणीं माझी मती गुंतली ॥ २२ ॥

---

## ५

# श्रेष्ठत्वाचा झगडा

अथवा

# दगडाचा मानव जातीस उपदेश.

## STURGGLE FOR SUPREMECY.

### आर्या गीति.

श्रेष्ठत्वाचा मोठा मानवजातींत लागतां झगडा ॥
उघडा उपदेश तयां करणें कां प्राप्त जाहलें दगडा ? ॥
उन्नतिगिरिशिखरावरि चढले पडले अनेकविध शास्त्रें ।
जरि तरि झगडति मानव बांधवहननार्थ योजिती शस्त्रें ॥
पगडा अहंकृतीचा, पडतां प्रज्ञेवरी कसा उडला ।
सगळा सुसंस्कृतिभ्रम विश्वासाचाच भोंपळा फुटला ? ॥
संक्षेपें हें कथुनी दृषदाचे बोध शब्द सांगेन ।
तत्सद्बोधश्रवणें होइल कां भरतखंड जागें न ? ॥

जागेन नित्य करण्या भारतभूभद्र, भावना चित्तीं ।
उपजेल बांधवांच्या तेणें लाभेल शेवटीं मुक्ति ! ॥

**वृत्त--दिंडी.**

एक दिवशीं वृत्तांत काय झाला । सांगतों तो पाहिजे श्रवण केला।
सभा भरली विस्तीर्ण वटाखालीं।लोक जमले विख्यात शौर्यशाली॥
मनुज तेथें पातले भिन्नदेशी । विषय आला चर्चेस त्यांजपाशीं ।
"श्रेष्ठ मानवजातींत कोण आहे।करीं ज्याच्या अधिकारसूत्र राहे"॥
एक बोले माझ्याच पुण्य देशीं । शूर असती श्रेष्ठत्व त्यांजपाशीं ।
वदे दुसरा अश्मेच इतर लोक! । श्रेष्ठ आह्मी सर्वांत हें विलोक ॥

**वृत्त–साकी.**

प्रतीचीस रवि सौभाग्याचा आला बोले तिसरा ।
प्रतीती पहा ! नित्य दिवाळी ! नित्य आमुचा दसरा ! ! ॥
यास्तव आह्मी श्रेष्ठ जगीं या, दास आमुचे व्हावें ।
पौरस्त्यांनीं आह्मीं देऊं तेंच सुखें सेवावें ॥
बोले चवथा पौरस्त्यीं नच पाश्चात्त्यींही नाहीं ।
मानवलोकीं श्रेष्ठ योग्यता नूतन[1] महींत राही ॥
सुज्ञानाचा श्रेष्ठत्वाचा हक्क आमुचा सारा ।
जगीं आमुच्या विमल यशाचा वाजे नित्य नगारा ॥
स्वातंत्र्याची माय आमुची नूतन–सुवर्णभूमी ।
सर्व जनांला सौख्य सारखें अमुच्या नगरीं ग्रामीं ॥
पंचम बोले निग्रोंला कां छळितां निरर्थ सारे ? ।
गौर–कृष्ण या भेदाचें कां खेळे अंगीं वारें ? ॥
प्राच्य संस्कृति प्रसर पावली धरा आमुची पूर्वीं ।
ऊर्वीवरली स्वर्णमेदिनी श्रेष्ठ हीच ! ही गुर्वी !!॥

१ अमेरिकेंत.

होते जेव्हां आंग्ल रंगवित रंगें अपुलीं अंगें ।
चर्में नेसुनि हिंडत होते वन्यपशूंच्या संगें ॥
कलासुविद्या सर्व तऱ्हेच्या संस्कृति सुधारणाही ।
शिकवित होती सर्व जगाला भारत वसुंधरा ही ॥
ज्येष्ठपणाचा श्रेष्ठपणाचा मान आमुचा आहे ।
पूर्व दिशेला भाग्यरवीची अरुणप्रभा पहा हे ! ! ॥
अन्य बोलती, पराधीन जे सत्त्वहीन जे त्यांला ।
श्रेष्ठपणाचा गर्व कशाला ! कोण पुसे दगडाला ? ॥

## श्लोक.

झगडति जन रागें बोलती एकमेकां ।
दगड, नवल झाले तत्क्षणीं काय ऐका ॥
जवळि दगड होता जीर्णसा त्यास वाणी ।
त्वरित फुटुनि बोले शब्द तो ज्ञानखाणी ॥

## आर्या.

दगड ह्मणे, "मज ह्मणतां, दगड तुह्मी नेणुनी खरी महती ।
मत्सुगुण सत्कृतींचे लोकीं सारेच जाणते नसती ॥
यास्तव उपमा देती मूढाला, मूढलोक दगडाची ।
हें गूढ त्यांस न कळे कीं, आहे थोर योग्यता ह्याची[1] ॥
ऐका तरि मग मानव, माझें व्याख्यान देउनी चित्त ।
लाभेल ज्ञान तुह्मां सुज्ञानें लाभतें जगीं वित्त ॥
शीतोष्णवारणास्तव सौख्यनिवासार्थ बांधिती सदनें ।
दीन श्रीमंतांची, राजप्रासाद देवताभवनें ॥

१ दगडाची.

हीं सर्व बांधण्याला करिती उपयोग लोक दगडांचा ।
हें न कळे ज्या मनुजा दगडाहुनि दगड तोच मनुजांचा ॥
दगडास दगड ह्मणतां नेणुनि अपुल्यांतल्या खऱ्या दगडा ।
लोकीं अज्ञानाचा ज्ञानाशीं लागला सदा झगडा ॥
पगडा अज्ञानाचा सुज्ञानावरि हरी ह्मणे बसला ।
कसला नर जरि असला मायाजालांत गुंततां फसला ! ॥
सावध व्हारे सारे! घ्यारे तत्त्वावबोध मच्चरितीं ।
भ्रमतां पुनः पुनः कां ? लोकीं चुकवा पुनर्भवप्रगति ॥
नम्रत्व, लीनता, हीं माझ्या हृदयांत ओतिलीं असती ।
यास्तव बहुशः करितों नम्रत्वें मृत्तिकेंत मी वसती ॥
करितों कधीं कधीं मी पवित्र सिंधूंत आपुली वसती ।
सिंधूदरीं कितितरी, प्राणी त्राणार्थ राहिले असती ॥
तेथुनि मजला शोधिति काढिति करिती प्रहार लोहाचे ।
देहाचा होय चुरा विचार करिती जन स्वगेहाचे ॥
सोशीं घाव घणाचे जाड्यत्वें बोलतां न ये मजला ।
ह्मणती याला उचला पायामध्यें बरा चिरा बसला ! ॥
पायामध्यें भरिती एकावरती अनेक ते दगड ।
ह्याचें कारण आह्मी सदना आधार हें दिसे उघड ॥
पाया झाल्यानंतर सदनाच्या भिंति बांधण्यासाठीं ।
दगडच पसंत करिती दगडाची मानमान्यता मोठी ॥
भिंती मातीवांचुनि प्रस्तरचूर्णाविना[1] न त्या होती ।
दगडास दाह देउनि करिति चुना घालिती मध्यें रेती ॥
वार्धक्यें ज्यां न दिसे, किंवा दृष्टी असे जयां थोडी ।
दगडी[2] उपनेत्रांची, त्यांच्या कामास येतसे जोडी ॥

१ दगडाचा चुना. २ गार.

विपिनीं अकिंचनातें, अनल मिळेना न अग्निची काडी ।
दगडी गारेपासूनि पाक करायास अग्नि तो काढी ॥
दगडास हांसतां परि दगडाची लेखणी तुह्मां शिकवी।
विद्या, दगडी पाटीवर, हें वर्णावया नको सुकवी! ॥
शिकवी विद्या तुह्मां, दगड जरी तरि कशास हो गर्व ।
विद्येचा मानावा, विद्यामृतदान द्या जनां सर्व ॥
विद्या शिकवी विनया, दगडापासून हीं शिका दोन्हीं ।
निष्पापवृत्ति लोकीं, शिकविति लोकांस बालकें तान्हीं ॥
मी रक्षितों सुविद्या, जैसी तैसी न रक्षिती अन्य ।
याकरितां पाषाणीं, कोरिति लेखांस भूपती धन्य ॥
देती पाषाण-शिला, दीन अकिंचन जनांस विश्रांती ।
श्रमले दमले निर्धन, बसतीं त्यांवर कुणी तिथें निजती ॥
माझ्या गुहांत करिती वसती योगी यतींद्र संन्यासी ।
संत महंत तपस्वी एकांतीं वास आवडे ज्यांसीं ॥
शांत गुहेंत मनाला जोडे एकाग्रता घडे भक्ती ।
संसारासक्ति उडे चिंतन करितांच लाभते मुक्ती! ॥
वर्षति वारिपयोधर, हर्षति टिट्टिभ मयूर नरनारी ।
पंकविदूषितवीथीं[१] जावें कैसें जनीं निजागारीं ॥
ऐशा समयीं माझा, करिती उपयोग जाणते नित्य ।
ठेवुनि पाय मम शिरीं, जाति गृहीं साधण्यास गृहकृत्य ॥
प्रावृट्कालिं कृषीवल, वांछिति कीं सजलता असो क्षेत्रीं[२] ।
दृषदांच्या साह्यानें, अडविति वारिप्रवाह ते क्षेत्रीं ॥
आणिक परोपकृतिचीं कार्यें करितों तुह्मांस तीं कथितों ।
मनुजसुखास्तव बनतों प्रस्तर पात्रें, न अन्न दूषवितों ॥

१ चिखलानें भरलेले रस्ते. २ शेतांत.

ताम्रारकूटपात्रीं[1], कळकति पातळ पदार्थ अन्नाचे ।
दगड न दूषवि त्यांतें वर्तन निर्दोष होय दगडाचें ! ॥
इतरां न दूषवावें, आपण तैसें बनूं नये दुष्ट ।
उपकृति नित्य करावी ह्यांत महापुण्य बोलती शिष्ट ॥
दगडापासुनि घ्यावे सद्गुण हे श्रेष्ठ सर्व लोकांनीं ।
रानीं कशास जावें मिळतां मुक्ती अशा उपायांनीं !॥
अविरत कर्म करा जन, यत्न करा स्तुत्य नित्य उपकारीं ।
अपकारी परपीडा वर्जा सद्विप्र जेविं अपकारीं[2] ॥
वापी कूपतटाकें बांधाया साह्य घेति दगडाचें ।
तीर्थांचे घाट तसे, पुण्यनद्यांचेहि पाट दगडांचे ॥
आरोग्यार्थ जनांच्या न्याया मलमूत्र सागरामाजी ।
करिति गटारें दगडी परजनविहितास मी सदा राजी ॥
कल्याणार्थ जगाच्या प्रस्तर देतो जगास राकेल[3] ।
राकांचेंहि[4] जयाच्या तेजानें दिव्य तेज झांकेल ॥
राकेलाचा करितां, स्वगृहिं उपयोग अज्ञ लोकांनीं ।
निष्काळजीपणानें, होतो अपघात हें धरा ध्यानीं ॥
हुतवहजलद्वयाचें[5] वैर असे स्वैर भांडती दोघे ।
जल नाशी ज्वलनातें, वारिविघातास वन्हि वाट बघे ॥
तात्पर्य यांत समजा अबलें सबलांसवें न झुंजावें ! ।
महदाश्रयाविना नच रिपुच्या मार्गांत आडवें जावें ॥
उद्यानीं कारंजीं धनिकांच्या शोभती गृहद्वारीं ।
तेविं जलाशय टांकीं प्रस्तरमय बांधितात जन सारीं ॥

---

१ तांबें व पितळ यांचीं भांडीं. २ मद्य. ३ घासलेट तेल. ४ पौर्णिमेचा चंद्र किंवा पूर्णिमा. ५ अग्नि व पाणी.

ताम्रा[1]श्मसार ह्यांचा फारच होतो जगांत उपयोग ।
बहुविध त्यांचीं पात्रें करिती भस्में हरावया रोग ॥
कवि अश्मसार ह्मणती लोहातें नांव हें जुनें ऐका ।
यास्तव अश्म्यापासुनि लोह निघे यांत कोणती शंका ? ॥
मेध्य[2] अमूल्य जयांतें गणिती ह्मणती जनीं रजत हेम ।
माझीच संतती ती, देति परि मला अमेध्य हें नाम ॥
इतरांस नीच ह्मणती मिरविति उच्चत्व आपुलेंच जन ।
विसरति परि ते हें कीं त्यांचें तेथेंच जाहलें जनन ॥
शार्मण्य[3] गौरें[4] ह्मणती दिधलें श्रेष्ठत्व ईश्वरें अवघे ।
आह्मां गौर जनांसच स्वातंत्र्याची दुजा कशी चव घे ? ॥
श्रेष्ठत्वाची ऐशी मिरविति जे मूढ आढ्यता लोकीं ।
अंतीं उपरति होउनि बुडती ते दुःखसागरीं शोकीं ॥
माणिक्य नील हीरक वैदूर्यादिक अमूल्य नवरत्नें ।
उपजति उपलां[5]पासुनि काढिति शोधून तज्ज्ञ हीं यत्नें ॥
उपयोग थोर अमुचा होतो मनुजांस नित्य संसारीं ।
परि ही मानवजाती तोषवि आह्मां कधीं न आभारीं ॥
भारी सद्गुणभारें जरि तरि आह्मांस मानिती हलके ।
बळ न कळे दगडांचें श्रेष्ठ तयाहून जाहलीं कळकें[6] !॥
मूढपणा मनुजांचा ऐसा पाहून वाटतें नवल ।
स्वश्रेष्ठत्व मिरविति ह्मणती सर्वांत मानव प्रबल ॥
मिथ्या अभिमान असा धरिती मानव कशास हें न कळे ।
बघतां सुविचाराच्या आदर्शीं आढ्यता पळांत पळे ॥

१ तांबे व लोखंड. २ यज्ञकार्यास पवित्र. ३ जर्मन. ४ गौरवर्णाचे पाश्चात्य लोक. ५ दगडापासून. ६ वेळू.

विश्वंभराविना नच विश्वीं श्रेष्ठत्व अन्य कोणाचें ।
तो करुणामय ईश्वर राहे हृदयीं पवित्र दगडाचे ॥
यास्तव मानवजाती दगडाहुनहि जगीं कनिष्ठ ठरे ।
कितितरि मानव भूवरि दुष्कृतिंनीं भरिति आपुलीं जठरें ॥
दगडांत देव राहे आहे ही कल्पना न दगडांची ।
मनुजांच्याच असे ही खूण महा कल्पनातरंगांची ॥
मानवहृदयीं राहे परमेश्वर परि दिसे न तो मनुजां ।
शोधिति इकडे तिकडे ह्मणती दगडांत देवता समजा ॥
दगड चला! या! आतां पुजूं भावें समस्त नरनारी ।
सांपडला हरि दगडीं दगडाची थोरवी किती भारी ॥
शालिग्रामाख्य शिला जन ह्मणती गंडकींत ज्या असती ।
पुण्यप्रदा बहुत त्या विष्णु करी त्यांत आपली वसती ॥
बाण श्रेयोदायक विप्र ह्मणति नर्मदानदी प्रसवे ।
ते पूजिल्याविना न स्वस्थपणें भाविकां गृहीं बसवे ।
यास्तव बाणांस तसें शालिग्रामांस पूजिती देही[1] ।
देहीं सौख्य मिळाया वैभव सन्मान संपदा गेहीं ॥
मानव पुढती ह्मणती एका देवीं न आमुची तृप्ती ।
बहुविध देव कराया स्वमनिं महा योजितात ते युक्ती ॥
बहुविध सद्गुण शक्ती देवाच्या तेवढ्या करा मूर्ती ।
त्यांचें दर्शन घेतां होईल तैशीच मानसीं स्फूर्ती ॥
कालस्वरूप काळीं समरीं धरिते ह्मणून या काळीं ।
काली झाली वाली वीरांची, रक्त बिंदु तद्भालीं ॥
कालीं उचित घनातें धाडुनि संतोषवी जनां कोण?।
पिकवुनि धान्यें चुकवी दुर्भिक्ष्या कोण वांचवी प्राण?॥

१ मनुष्य. २ पर्जन्य.

इंद्र तयाची अभिधा, त्याची सहकारिता करी वरुण ।
कारण वारिसमुच्चय अधिपतिवांचून रक्षितो कोण ?॥
सृष्टि-स्थिति-लय-शक्ती देवाच्या तीन देवही तीन ।
झाले तत्सादृश्यें, विधि हरि हर वंदिती जयांस जन ॥
सावित्री विधिवामा[1], दिधली रामा[2] रमा घनश्यामा ।
सोम[3] सदाशिव केला, तद्वामा तीच कालिका परमा ॥
प्रणवस्वरूप गणपति ॐकाराचीच देवता केली ।
केली करावयातें ऋद्धी सिद्धीहि आणिल्या आली ॥
आली सरस्वती मग, विद्येची देवता जनीं झाली ।
आली कविवृंदांची विद्यार्थिजनांस माउली वाली ॥
गृहदेव ते निराळे ग्रामांचे देव देवता भिन्न ।
स्थलदेव जाहले बहु भजकां वाटूं नये कधीं न्यून ॥
एकाचे तीन प्रभु तिहिंच्या तेहतीस देवताकोटी ।
स्वर्गीं स्थान मिळेना धांदल उडली जगांत या मोठी ॥
आले सदार सुरवर अमरापुराहून आश्रया इकडे ।
भ्रमति विचारिति बोलति देवनिकेतन मिळेल कोणिकडे ! ॥
दृषदीं आश्रय दिधला ह्मणुनि दृषदांत देवता येती ।
ऐसें कल्पुनि मानव दगडी मूर्तींत देवता भरिती ॥

## श्लोक.

मूर्ती जगीं घडविती दगडी अनेक ।
त्यांच्यांत कल्पिति यथा—मति देव लोक ॥
धात्यास चार वदनें शिव पंचवक्त्र ।
विष्णूस चार कर शोभविती पवित्र ॥

---

१ ब्रम्हदेवाची पत्नी. २ सुंदर स्त्री. ३ स+उमा=सोम=सांब.

लक्ष्मी सती गणपती दगडांत येती ।
लिङ्गीं सदाशिव शिरे दगडीं त्रिमूर्ती ।
श्रीकृष्ण राम हनुमान् दगडी सुरेख ॥
प्रत्यक्ष सूर्य भगवान् दगडांत देख ॥

सर्वत्र देव वसतो मम कां न राहे ।
मूर्तींत देव परि मूर्ति न देव आहे ॥
ही भावना न मनुजीं विसरून जावी ।
ठेवून भाव दृढ मूर्ति सुखें पुजावी ॥

जरी सकल देवता करिति वास अश्मोदरीं ।
तरी न निज अंतरीं लवहि गर्व त्याचा धरीं ।
न वृत्ति मम पालटे तनु झिजे पराकारणें ।
प्रियव्रत मदीय कीं मनुजसौख्य विस्तारणें ॥

श्रीव्यास सांगे बघतां पुराणीं । अष्टादशीं एकच देववाणी ।
परोपकारासम पुण्य नाहीं । पीडा जनां दूषवि पातकांही ॥

ह्मणुनि मनुज ब्यारे बांधवप्रेमवारें ।
करुनि उपकृतीतें घालवा दुःख सारें ।
नसति नयन त्यातें द्या गृहीं स्वीय थारा ।
करचरणविहीनीं थांबवा पोटमारा ॥

गतधव अबला ज्या त्यांस कां त्रास देतां ? ।
रुचिर कचकलपा कापितां दूर नेतां ॥
हृदय थरथरारे देखतां दुष्ट मुंडी ।
ह्मणति मरण देई धांव गे माय ! चंडी !॥

परिसुनि वच ऐसें भारती बालिकांचें ।
सदय हृदय माझें पाझरे पथ्थरांचें !॥

अकरुण मजपेक्षां निर्घृणत्वें मलीन ।
मनुज दिसतसा रे पातकी ज्ञानहीन ! ॥
हरितसां विधवा नगभूषणां ! । त्वरित भंगितसां करकंकणां !॥
गळसरी प्रिय मंगलसूत्र तें! करुनि भग्न कसें सुख वाटतें !॥
पडति त्या धरिणीवरि बालिका ।
विनविती नमिती चरणा फुका ॥
परि न शब्द वदा, शुभकुंकुमा ।
पुसितसां ! कृति हे अधमाधमा !॥
रुचिर कुंकुमचीर हरावया ।
लवहि लाज नसे न मनीं दया ।
सदयता दयिताविषयीं कशी ।
विरमली श्रमली जनमानसीं ॥
मनुज ! या पुढतीं करुनि त्वरा ।
चिरुनि कंचुकिचा करिती चुरा ।
छळुनि आपुलिया प्रिय लेंकुरां ।
अहह ! लाजविती यमकिंकरां !!॥
युवतिनिधनकालीं आपुली लांब शेंडी ।
त्वरित हरुनि नेण्या आणितां कां न मुंडी[1]? ।
असुख जरि तुह्मां तें होय पत्नीवियोगें
उपटुनि न मिशा कां टाकितां दुःख रागें ?॥
व्रतस्थ व्हावें जरि बायकांनीं ।
स्वनाथ जातां, नच कां नरांनीं ? ।
तसें करावें ललनावियोगीं ।
मी सांगतों युक्ति नरोपयोगी ॥

---

१ हजाम.

पत्नीच्या निधनीं अहो! द्विज! शिरीं काढा त्वरें पाट ते।
प्रायश्चित्त मिळे नरांस बरवें या ब्रह्मचर्यव्रतें।
पाटीं सिंदुर सिंचुनी मग करा ते भांग वेणी फणी:।
पत्नीच्या स्मरणार्थ सोंग आपुलें आणा जनीं आपणीं।
लोकीं जे गत–भर्तृकांस छळिती संत्रासिती गांजिती।
वेणी–कुंतल–कृंतनार्थ जलदी मुंडीस जे आणिती।
जे जे निर्दय कंचुकी चिरविती जे कंकणें भंगिती।
प्रायश्चित्त तयांस हेंच करितां लाभेल त्यां सद्गती॥

## आर्या.

मी भेद–भाव न धरीं उपकृति माझ्या जगांत सामान्य।
यास्तव मनुजांस तसा झालों देवास सर्वथा मान्य॥
मत्सम देवप्रियता संपादाया वरा मदीय गुणां।
ब्रह्मचि निर्गुण मानुनि चिंता चित्तीं परात्परा सगुणा॥
दगड कुणास न बोला सद्‌गुण दगडांतही बहुत असती।
दिसती लहान गुरखे परि समरीं ते प्रताप दाखविती॥
असती सतीव भासे अनभिज्ञाला गमे सती असती।
चमकति पदार्थ बहुविध सारे नच ते खरे हिरे असती॥
सुज्ञीं सामर्थ्याचा अभिमान वृथा कदापि न धरावा।
परक्यास दास अपुले करण्याचा दुष्ट हेतु विसरावा॥
सर्वांस आत्मवशता[3] प्रिय वाटे आवडे न परवशता।
परसत्ता हरिती ते आवडती जन कधीं न भगवंता॥
परदु:खें दु:खित जे उत्कर्षें हर्षती परांच्या जे।
धन्य! जगीं ते सज्जन! दिसती सम ज्यांस रंक वा राजे॥

१ बाजारीं. २ वपन. ३ स्वातंत्र्य.

धन्य ! जगीं ते नरवर ज्यांच्या हृदयीं क्षमा दया शांती ।
उपकृतिरति सद्धर्मश्रद्धा दाक्षिण्य सत्य नयनीति ॥
देव अशांच्या हृदयीं राहे राहे न नित्य वैकुंठीं ।
दृषदीं विपिनीं न मिळे भक्तिविना माळ घालितां कंठीं ।

## श्लोक.

घेतां निरोप करितों विनती तुह्मां मी ।
निःस्वार्थ नित्य झिजतों तुमच्याच कामीं ॥
पीडा कुणास करण्यास कुणा हणाया ।
योजा कधीं न मम ही सुपवित्र काया !" ॥
ही संपली दगडराजकथा रसाळ ।
सेवोत ! सुज्ञ सुमती लघु थोर बाळ ॥
देईल सौख्य सुरुची सकलां समान ।
पाहून होतिल हिला जन सुप्रसन्न ॥
हें श्राव्य काव्य रचिलें पुरुषोत्तमानें ।
केला प्रसाद सदयें पुरुषोत्तमानें ॥
प्रार्थीं तयास सदयास कृतप्रणाम ।
ठेवीं निरंतर मुखीं मम रामनाम ॥
विश्वास जो निखिल निर्मि निजप्रभावें ॥
विश्वास ठेवुनि पदाब्जि तयास भावें ।
प्रार्थीं, विभो ! विभव दे प्रिय भारताला ।
आरोग्य आत्मवशता अवघ्या जगाला !!! ॥

६

# कुमारी शतावली.

## श्लोक.

गेली माय तुझी पवित्र भुवनीं त्यातें पुरे चारही ।
झाले मास न तोंच कां जलदिनें त्वां त्यागिली ही मही ? ॥
मातृप्रेम तुझें विशेष न सहे तूतें वियोगानल ।
मातेसाठिं झुरे स्वसे ! निशिदिनीं त्वच्चित्त तें प्रेमळ ॥१॥
केलें यास्तव कीं प्रयाण सुहृदां आप्तांस ही टाकुनी ? ।
झाली अल्पवयांत अप्रिय तुला ही मानवी मेदिनी ? ॥
किंवा धार्मिक पुस्तकें परिसतां वैराग्य चित्तांत ये ।
ह्यासाठीं प्रभुच्या पदीं प्रणत तूं झालीस कीं निश्चयें ? ॥२॥
ज्ञाता वृद्ध पिता तयास दुहिता तूं एकली चांगली ।
पत्नीच्या असुखें मना असुखता ज्याच्या असे लागली ॥
त्यातें टाकुनियां प्रयाण करितां वात्सल्य गेलें कुठें ? ।
अन्यांच्या असुखें तुझ्या सतत जें वात्सल्य चित्तीं फुटे ॥३॥

विपत्प्रसंगीं तुजवीण ताता ।
त्राता दुजा कोण जगांत होता ? ॥
बोलूनियां सस्मित गोड वाणी ।
सांत्वील त्या कोण अतां शहाणी ? ॥ ४ ॥

---

१ मुंबईचे माजी गव्हरनर लॉर्ड सिडेनूहॅम क्लार्क यांची परलोकवासी राहुणी कन्या मिस् क्लार्क याना उद्देशून हें काव्य रचिलें आहे.

आधार तूं धैर्य सखा तदीय ।
होतीस तूं एकचि तत्स्वकीय ॥
प्राणापरी आवडसी पित्यातें ।
सोडून गेलीस किमर्थ त्यातें ? ॥ ५ ॥
येतांच मुंबानगरांत, भक्ती ।
या भारतस्थीं धरुनी स्वचित्तीं ॥
प्रयत्न केले विविध प्रकारीं ।
आचाररूढी शिकण्यास सारी ॥ ६ ॥

सहानुभूती ममता लहान !
मोठ्यांसवें त्वद्हृदयीं समान ॥
शास्ते तथा शासित बंधुभावें ।
ह्या भारतीं एकमतें रहावें ॥ ७ ॥

स्वकीयांच्या काजीं असतिस जरी दक्ष न तरी ।
अह्मां त्याचें मोठें कुतुक, जन कर्तव्यच करी ॥
अनाथाच्या काजीं झटलिस सदा निर्मल मनें ।
सुकीर्तीची माला ग्रथिति सुकवी काव्य-सुमनें ॥ ८ ॥

अस्पृश्य ज्यांतें जन-संघ बोले ।
छायाहि ज्यांची न जनांस चाले ॥
हिंदू असूनी न जयांस बंधू ।
ते मानिती ब्राह्मण-धर्म-सिंधू ॥ ९ ॥
साहाय्य त्यांतें करण्यास यत्न ।
केले तुवां पुण्य-पुरींत नूत्न ॥
तें वृत्त आहे सुजनांस ठावें ।
सदा सुकृत्यास जनीं स्तवावें ॥ १० ॥

तव सुकृति बघुनी भूप कोल्हापुरीचा ।
अनुकृति करण्याला सिद्ध झाला, दयेचा ॥
नद हृदिं फुटला कीं; सद्विचारी सयाजी ।
सदयहृदय झाला साह्य देण्यास राजी ॥ ११ ॥

" हिंदूंच्या विधवा अनाथ अबला दुःखास ज्या भोगिती ।
त्यांची कींव मनास ये स्वनयनीं त्यांची पहाया स्थिती ॥
गेलें पुण्य पुरींत मी जनकही त्या बालिकांच्या गृहा ।
त्यांतें पाहुनियां दया उपजली चित्तांत माझ्या महा ! ॥ १२ ॥

द्यावें साहाय्य विधवा-भगिनी-जनांतें ।
चित्तीं मनोरथ असे; परिपूर्णतेतें ॥
नेईन मी निज पित्यासह या वसंतीं ।
मुंबापुरींत, असुं द्या तुमची पसंती " ॥ १३ ॥
बलगिरिसं[1] रहातां हेतु हे प्रेमभावें ।
मजसिं विदित केले लेखनीं सुस्वभावें ॥
परहित करणें हें साधु कर्तव्य मानी ।
इतर निजहिताच्या ग्रासिले कल्पनांनीं ॥ १४ ॥
झाले मनोरथ न जों परिपूर्ण कालें ।
मुंबापुरींतिल मनोहर रत्न नेलें ! ॥
गेला गमे स्वजन ! बंधु ! सखा ! स्वसाही !! ।
उत्साह धैर्य न दिसे नगरांत कांहीं ! ॥ १५ ॥
स्मरुनि तव गुणांतें खिन्नता ये मनातें ।
घमघमित करी जी पुष्पगंधें वनातें ॥

---

१ महाबळेश्वराहून वरील आशयाचें पत्र कवीस मिस् क्लार्क यांनीं पाठविलें होतें.

मृदुकुसुमलता ती भंगिली झंझवातें ! ।
तदिव गति जहाली आज मुंबापुरातें ! ! ॥ १६ ॥

तुजसिं रुचिर ज्याची आवडे गोड वाणी ।
ह्मणति विबुध ज्यातें बुद्धिमान् ज्ञान-खाणी ॥
परिचय मज ज्याचा जाहला त्वत्कृपेनें ।
हसित मुदित झालों काव्य-पीयूष-पानें ॥ १७ ॥

सकलकविजनांचा अग्रणी आंग्लदेशीं ।
स्तविति भजति विद्वान् ज्यास अन्य प्रदेशीं; ॥
प्रिय तव कवि ज्याचें काव्य सारें सुवर्ण ।
अहह ! दिसत नाहीं आज तो स्वर्णवर्ण ! ! ॥ १८ ॥

झाला त्वद्गमनास मास न पुरा तों स्वीनबर्नाख्यही ।
गेला सोडुन आंग्लभौम–सुकवी[1] ही मानवांची मही ! ॥
गेले त्वत्सम तद्गुणज्ञ अवघे टाकून या भूतला ।
भेटाया गमतें तुला प्रिय कवी स्वर्गाकडे धांवला ! ॥१९॥

वत्से ! परोपकृतिच्या प्रियपुण्ययागीं ।
प्राणाहुती म्हणति देउनि जें प्रयागीं ॥
भक्तांस पुण्य न मिळे तुजला मिळालें ।
नामास सत्कृतिबळें अमरत्व आलें ॥ २० ॥

आंग्लांच्या युवती तुझ्या सम जरी साऱ्याच या भारतीं ।
वाणीनें करितील पुण्यकृतिनें लोकोपकाराप्रती ॥
सारी भारतभूमि होइल अम्हां स्वर्गांतलें नंदन ।
वंगस्थांसहि भंग विस्मृतिद कां होईल आनंद न ? ॥२१॥

---

१ आंग्लकवि स्वीनबर्न.

आंग्लां सादर ही असे विनवणी तुह्मां जरी पाहिजे ।
सत्ता भारतभूमिकेंत सुचिरा, सत्तेमुळें लाभ जे ॥
ठेवा प्रेम मनीं क्षमा सुजनता, आह्मां करा बांधव ।
दोघांच्या विहितार्थ रक्षिल तुह्मां तो संकटीं माधव २२
वात्सल्यें आमुच्या जनां सुखविलें विद्यामृता पाजिलें ।
त्यानें होऊन हृष्ट पुष्ट आमुचें ज्ञानांग हें वाढलें ॥
पूर्वी जें झबलें आह्मांस शिवलें आतां न आंगास ये ।
तुह्मीं पालक बालकें असुख कां तुह्मांस सांगूं नये ? २३
प्रार्थीं बंधुजनां स्मरा विजयिनी साध्वी सती माउली ।
फासेटादिक आंग्ल भौम सुकृती दीनांस जे साउली ॥
ठेवा प्रेम मनीं जनीं विजयिनी-पुत्रीं-प्रपौत्रीं सदा ।
सोडा मत्सर, ईश नेइल लया चिंता व्यथा आपदा ॥२४॥
देवा ! त्वच्चरणीं असे विनवणी विद्वन्मनोमोहिनी ।
दीनांची भगिनी महाप्रणयिनी टाकूनि ही मेदिनी ॥
गेली ! जी तरुणी सुरेंद्र-भुवनीं सज्जॉर्ज-हृन्नंदिनी ।
सेवो! शांतिसुखास ती सजननी स्वर्गातल्या नंदनीं ! ॥२५॥

१ आपल्या कृपाळु जार्ज बादशहांवर.

७

# युवराज-निधन-काव्य.

## सर्ग १ ला.

### नृप-संबोधन.

नमन करुनि भावें त्वत्पदीं ब्रह्मकन्ये !
तुजसि विनवितो हा दास देवेन्द्र-मान्ये !
उठ ! उठ ! उठ ! पाहीं काय वृत्तांत झाला !
अकरुण यमदूतीं घातला घोर घाला ! ॥ १ ॥

निस्तेज झालें अवघें बडोदें । निःशब्द झाले जनसंघ, कोंदे ।
निःश्वास उच्छ्वासहि दुःखवेगीं । कुलस्त्रिया स्फुंदति जागजागीं ।२।
वटोदराच्या हृदयें जनांचीं । दुःखातिरेकें अवघ्या प्रजांचीं ।
भरून आकंठविशाल झाली । वटोदरा सार्थकताच आली ॥ ३ ॥
दिसे महाराष्ट्रमही-मुखेंदु । कां म्लान ? नेत्रीं गळतात बिंदु ? ।
मुंबापुरीच्या अवघ्या जनांला । कां दुःख वाटे कविच्या मनाला ?॥
न दक्षिणेलाच चतुर्दिशांला प्राची प्रतीचीसहि उत्तरेला ।
सर्वत्र कां भारतभूमिमाजीं । विषाद भासे सकलां समाजीं ? ॥५॥
वटोदराख्या शुभ राजधानी । वसे तिथें देशहिताभिमानी ।
राजा प्रजारंजनकाम याजी[2] । याजी ह्मणूनी म्हणती सयाजी[3] ॥६॥
राजी प्रजा सांगति दानराजी । गाजी नृपाच्या कावबय गाजा ।
हांजी करी त्यास न मित्र मोजी। त्याजी[4] सयाजी स्तविला समाजीं

१ प्रजाहितदक्ष राजा श्रीमान् सयाजीराव गायकवाड यांना युवराज फत्तेसिंहाचे निधनामुळें झालेल्या दुःखाच्या परिमार्जनार्थ रचिलेलें काव्य.
२ याजी=धर्मशील. ३ संस्कृत स+याजी=सयाजी. ४ त्याजी=उदार.

नक्षत्रांत जसा शशी चमकतो, रत्नांत जैसा हिरा, ।
शोभे सूर्य जसा नभीं ग्रहगणीं रंकां नृपां सोहिरा ।
तैसा भारत भूमिकेंत विलसे सद्भूप जो एकला ।
त्याच्या, हंत ! गृहीं कृतांतकटकें घाला पहा घातला ॥८॥
जैसा चापधरांत राम अथवा काव्यीं महाभारत ।
किंवा इंद्रसभेंत देवगुरुजी सच्छास्त्र—पारांगत ।
तैसा भारतभूकिकेंत विलसे भूपाग्रणी एकला ।
त्याच्या हंत ! गृहीं कृतांतकटकें घाला महा घातला ९.
नाना पंथमतें जिथें पसरलीं जाती असंख्यात ही ।
केली कर्मठ दांभिकीं विगतभा ही भारताची मही ।
हें पाहून सदा मनीं हळहळे ! देशाभिमानी भला ।
घाला हंत ! पहा कृतांतकटकें त्याच्या गृहीं घातला १०
त्याचा पुत्र सुधी पराक्रमपटू धैर्यें जणूं सिंहसा ।
फत्तेसिंह जयास नाम, विबुधीं वाखाणिला फारसा ।
ऐसें दुर्लभ पुत्र रत्न हरिलें काळें महा निर्दयें ।
वाग्देवि ! द्रुत ऊठ ! काय अजुनी त्वां मौन घ्यावें स्वयें? ११
सहानुभूती निजबांधवाची । निवेदुनी आधि हरूं मनाची ।
सांगूं नृपातें तव दुःखभागी । आम्हीं असो बांधव जागजागीं ॥१२॥
तुह्मी सुज्ञ किती ! बडोदरपती ! तुह्मांस संबोधणें ।
वाटे दुर्घटसें मनास कविच्या कैलास उल्लंघणें ।
पंगूनें, परि एक गोष्ट बरवी लक्षांत ठेवा खरी ।
शोकक्षुब्ध मनास मोह उपजे चिंता जडे अंतरीं ॥ १३ ॥
सुपुत्र लाभे खलु पूर्वपुण्यें । सुपुत्रलाभार्थ महाअरण्यें ।
दिलीप धुंडी गुरुधेनुमागें । द्यावें सुपुत्रा वरदान मागे ॥ १४ ॥

दिलीपपत्नीहि करी व्रतातें । सुपुत्रलाभार्थ, पुढें सतीतें ।
सुपुत्र झाला अजनाम ज्याला । आनंद झाला अवघ्यां प्रजांला १५
पुण्यप्रतापें तुमच्या तुह्मांला । सुपुत्रही अल्प वयांत झाला ।
दिलीप भूपासम अप्रयत्नें । सद्भाग्य आलें युवराजरत्नें ॥ १६ ॥
दिलीप ज्या सूर्यकुळांत झाला । श्रीराम जेथें उदयास आला॥
ज्या सूर्यवंशीं निपजे शहाजी । महाप्रतापी नृपती शिवाजी १७
साऱ्या महाराष्ट्रमहीस ज्यांनीं । स्वातंत्र्यसौभाग्य दिलें प्रयत्नीं ।
त्या भानुवंशोद्भव भोसल्यांची।कन्या सदाख्या चिमणा जियेची १८
ती भाग्यशाली तुमची सुजाया । पतिव्रता वीरजनार्हणीया।
ईशप्रसादें प्रसवे सुपुत्र । स्वर्गेह तुह्मांस गमे परत्र ॥ १९ ॥
सुपुत्र तो पाहुन चारुगात्र । आनंद सर्वत्रच, धर्मशास्त्र ।
पाहून केले बहुदानधर्म । केलं प्रमोदें मग नामकर्म ॥ २० ॥

फत्तेसिंह अशी तयास अभिषा सार्था दिली ती सुखें ।
विद्याज्ञान शिके स्वकीयच करी तो आंग्लभाषा मुखें ।
बोले पंडितसा रसाळ, सुमती येऊन मुंबापुरीं ।
विद्यापीठनिदेशनार्थ, विजयी होऊन जाई घरीं ॥ २१ ॥

प्रयाण मग तो करी सुमति आंग्लदेशामध्यें ।
शिके विविध शास्त्रिचें मथित वेद्य जें जें बुधें ।
सुसंस्कृतमती सुधी फिरुनि ये स्वदेशाप्रती ।
पित्यास सुजनांस दे अमित हर्ष, वर्णू किती ॥ २२ ॥

विवाह मग जाहला कुलवधू सुरम्याकृती ।
सुशिक्षित सुभाग्यदा उचित नाम पद्मावती ।
गुणें सतत आवडे जशि हरीस पद्मावती ।
तशीच युवराजया प्रिय गमे स्व पद्मावती ॥ २३ ॥

श्वेतांबरीं जैन सभाप्रसंगीं । करून संभाषण गोड अंगीं ।
किती वसे धैर्य ! दया किती ती! सहानुभूती किति सर्व भूतीं २४
हें दाविलें सर्व सभासदांला । आनंद झाला निज बांधवांला ॥
पाहून विद्वान् युवराज, शिष्टीं । सभेंत केली बहु पुष्पवृष्टी ॥२५॥

" ह्या भारतीय वसुधेंतिल सर्व राजे ।
विद्याविहीन धृति तेज मुखीं न राजे " ।
लोकोक्तिची अनृतता निज सद्गुणानें ।
तुह्मीं तशी कळविली तुमच्या सुतानें ॥ २६ ॥

चातुर्यानें स्वतःच्या मिळवुनि विमला ज्ञानदाक्षिण्यकीर्ति ।
गेला वैकुंठलोकीं प्रिय सुत तुमचा भोगण्या दिव्य मुक्ति ।
ह्यालागीं श्री सयाजी! निजमनिं न मुळीं स्थान शोकास द्यावें।
सारासारज्ञ तुह्मी नृपति अधिक तें काय तुह्मां कथावें॥२७॥

वरीं खालीं येती पुनरपि वरीं खालिं फिरती ।
जसे सारे आरे करिति रथचक्रासमगती ।
तशीं जाती येती सुख असुख दोन्हीं समगती ।
सुधी ज्ञानी मायामय निखिल संसार गणिती ॥ २८ ॥

जयाच्या हें मायामय पटल नेत्रीं वसतसे ।
तया कायाजायाधनसुतसुताशाश्वति दिसे ।
ह्मणे माझे माझे हय गज रथी सेवकजन ।
अहंकारें सारें कुमति विसरे ईशभजन ॥ २९ ॥

पडे जेव्हां देवीं विसर, सगळें दैव उलटे ॥
सुटे सत्यप्रीती नय विनय जाती धृति खुटे ।
वठे पापासक्तीं, षडरिगण चित्तांत उमटे ।
अहा धिग् ! धिग् ! त्यांतें प्रभुपदिं जयांचें मन विटे ! ३०

तरी येतां विघ्नें कठिण बहु वज्रासम जरी ।
जगीं ज्ञाते त्यांतें वचकति न एकक्षणभरी ।
जगन्नाथीं भक्ती अचल दृढ विश्वास धरिती ।
त्यजी ना कल्पांतीं शरण रिघती त्यां यदुपती ॥ ३१ ॥

जन्मास ये त्यास असेच मृत्यु । तो आज वा अब्द-शतीं परंतु ।
जयास जी नेमियली इयत्ता । ती कोण उल्लंघिल दैवसत्ता ?॥ ३२॥
राजा असो रंक असो लहान । मोठा असो पंडित लोकमान्य ।
साधू असो स्तेन असो कसाहि । दैवी इयत्ता चुकणार नाहीं ॥३३॥

आत्म्या नसे मरण तें तनुलाच पाहीं ।
आत्मा असे अमर ही तनु तेविं नाहीं ।
घेतों नवीन वसनें त्यजुनी विजीर्ण ।
आत्मा तसाच धरितो नवदेह पूर्ण ॥ ३४ ॥
शोकास काय मग कारण सांग राया ? ।
लोकास दिव्य युवराज असेल; वाया ।
काया स्वकीय शिणवून मनास आधी ।
द्यावी न, गोष्ट उमजेल न केविं साधी ? ॥ ३५ ॥

होता कवीस सुत एकुलताच एक ।
चातुर्यधैर्यगुणयुक्त अती सुरेख ।
जन्माष्टमीस शुभदायक जन्म झाला ।
श्रीकृष्ण—सूर्यच गमे उदयास आला ! ॥ ३६ ॥

बाल्यांत दाखवि सुबुद्धि अतर्क्य लीला ।
आनंदवी न कविलाच सुधी जनांला ।
‘ म्यां पाहिला न दुसरा असला सुपुत्र ’ ।
ऐसें कवीस ह्मणती कविचे सुमित्र ॥ ३७ ॥

झालीं न चार वरुषें परिपूर्ण त्याला ।
तों अंतकें निजगृहीं कविबाळ नेला ।
झाला कवीस कविपत्निस शोक त्याचा ।
तुह्मी करा नृप विचार मनांत साचा ! ॥ ३८ ॥

झाला पुत्रवियोग ह्याच सम कीं पूर्वीं स्मरा अंतरीं ।
दुःखाची जणु का शिळाच पडली राजाधिराजावरी ॥
धैर्यें सप्तम एद्वर्द नृपती दुःखोदधी आटवी ॥
ठावें वृत्त तुह्मांस सर्व न कवी हीं गोष्ट सांगे नवी ॥३९॥

संदेश तो पाठवि राजराजा । शांती वरा, धैर्य धरा, समाजा ।
संतोषवा सत्कृतिच्या बलानें । विशेष केवीं कथिजे कवीनें ? ॥४०॥
संदेश तो पाठवि लार्ड मिंटो । दुःखातिरेकोद्भव शोक खुंटो ।
शांती वरा धैर्य धरा समाजा । संतोष द्या, ध्या करिं धर्म-काजा॥४१॥

ज्याचे पूर्वज वंदनीय अपणां साऱ्या मराठ्यां जनां ।
ज्याचें तें मृगया–पटुत्व बघुनी आनंद वाटे मना ।
तो श्रीमत्करवीर–छत्रपतिही संदेश धाडी स्वयें ।
चित्तीं शांति वरा विषाद विसरा धैर्या धरा निश्चयें ॥४२॥

वक्ता थोर सुधी नय-प्रियसखा भोक्ता ऋताचा सदा ।
जो अस्पृश्यजनां सहाय्य करुनी त्यांच्या हरी आपदा ।
तो नारायणही तुह्मांस विनवी चंदावराख्या जया ।
चित्तीं शांति धरा विषाद विसरा मोह त्यजा राजया !॥४३॥

मुंबाभिषग्वरविभूषणही नृपाळा ।
तो भालचंद्र सुमती कथितो कवीला !
पद्यीं रसाळ मम पूर्ण सहानुभूती ।
सांगे नृपास धृति शांति वरा स्वचित्तीं ॥ ४४ ॥

शांती वरा नृपवरा, तरि तूर्ण आतां ।
त्राता तुह्मीच युवराज-सुतास, कांता ।
दु:खानल—व्यथित जी तुमच्या सुताची ।
बोधें करा त्वरित शांति तिच्या मनाची ॥ ४५ ॥

वैधव्यदावानलपीडितांला । बघून झाला तुमच्या मनाला ।
विषाद केले प्रतिकार-यत्न । कवी सदा वर्णिति भूपरत्न ॥ ४६ ॥
अन्या जनांच्या दुहितास्नुषांतें । वैधव्यडोहीं बघतां जयातें ।
विषाद वाटे, कविनेंहि त्याला । कसें कथावें धृति दे स्नुषेला ? ॥४७॥

प्रियतम तव जेवीं इंदिराराज कन्या ।
प्रियतम दुसरीही इंदिरा राजमान्या ।
सुमति गणिति पद्मा इंदिरा एक दोन्ही ।
सुमति नृपतिला हें ठाउकें काय नाहीं ? ॥ ४८ ॥

पहा ! देश आला निकृष्टस्थितीला ।
प्रभूवीण वाली नसे भारताला ।
समाजीं जहाल्या असंख्यात जाती ।
जणूं एकमेकां गिळाया पहाती ॥ ४९ ॥

वेदास संमत न ज्या नच ज्या पुराणीं ।
नाहीं स्मृतींत कथिल्या निजपूर्वजांनीं ॥
ऐशा सहस्र किति जाति सहस्र पंथ ।
ह्या भारतीं उपजले ! करिती अनर्थ ! ॥ ५० ॥

अज्ञानोदधि-वीचि-मग्न अपुले राया पहा बांधव ।
विप्रक्षत्रियवैश्यशूद्रजन त्यां द्याया तरायास्तव ॥

---

१ पद्मा ह्मणजे इंदिरा किंवा लक्ष्मी, व इंदिरा म्हणजे पद्मा किंवा लक्ष्मी, ह्मणून इंदिराराजा कन्या आणि पद्मावती राजस्नुषा ह्या भिन्न नाहींत.

नौका ज्ञानमयी, प्रयत्न करिती लोकांत जे सन्मती ।
द्याया साह्य तयांस योग्य न दुजा तुह्मांविना भारतीं ॥५१॥
प्रभूनें इथें धाडिले आंग्लभौम । कराया अह्मां शाहणे, पूर्ण मर्म ।
मनीं जाणुनी सर्व लोकां शहाणें । करावें तुह्मी ज्ञानपीयूषदानें ५२
देती जे बुडत्यास हात समयीं एका दुजा वा तरी ।
त्यांतें पुण्य घडे, विशेष घडतें पांचां दहांतें तरी ॥
देती जे समयीं, परंतु बुडत्या राष्ट्रास जे काढिती ।
अज्ञानोदधितून नैव दिसते पुण्यास त्यांच्या मिती ॥५३॥
टाकूनी शोक आतां जनपद-विहितीं शंसनीय प्रयत्न ।
पूर्वीं केलेत तैसे अनुदिनहि पुढें चालवा यत्न नूत्न ।
कल्याणा भारताच्या जगदधिप तुह्मां दीर्घ आयुष्य देवो ! ।
अज्ञानध्वांतपंथ त्यजुन निजजन ज्ञानमार्गांत येवो ! ॥५४॥

---

## सर्ग २ रा.

### युवराज्ञी-संबोधन—कृतांत-विडंबन.

अंतःपुरांत बघ देवि ! इथें किमर्थ ।
ह्या हाय ! हाय ! म्हणती करिती अनर्थ ।
राजाश्रिता कुलवधू अबला दुजा ही ?।
ही त्यांत कोण अति विव्हल चित्त पाहीं ? ॥ १ ॥
कोमेजला दिसतसे क्षिति हा मुखेंदु ! ।
हे टप्टपां गळति तन्नयनाश्रुबिंदु ! ॥
हे रत्नहार पडले; गळती गळ्यांचीं ।
मोत्यें; सरी गळसरी न दिसे मण्यांची ! ॥ २ ॥

तीं कंकणें बद्र तिथें नव मौक्तिकांचीं ।
ही टाकिली दिसतसे नव-रत्न-कांची !
भाळीं नसे तिलक तो शुभ कुंकुमाचा !
हा ! नाथ ! नाथ ! करिते स्तव माधवाचा ! ॥ ३ ॥
आर्तस्वरें म्हणतसे मज नाथ दावा !
दावानलीं जळतसें ! जगदीश धांवा !
वाग्देवि[1] ! हे कुलवधू युवराज पत्नी ॥
सांत्वील कोण इजला सुमती प्रयत्नीं ॥ ४ ॥
पद्मावती गुणवती प्रिय जेविं पद्मा ।
विष्णूस पद्मनयना; स्वपती स्वसद्मा ।
येतां प्रसन्न वदना सदनास मानी ।
जी नंदनासम सती सुविचार-खाणी ॥ ५ ॥
जी भासली स्व-पतिला सुतराम् शिराणी ।
जी वर्णिली बुधजनीं सुमती शहाणी ।
ती हाय ! हाय ! अधुना युवराज–राणी ।
झाली अनाथ अबला अति दीनवाणी ! ॥ ६ ॥
सत्पुत्ररत्नजननी जननीस झाला ।
आनंद नंदवि सती पतिच्या पित्याला ।
मासद्वयांतचि अहा ! युवराज-राणी ।
झाली अनाथ अबला अतिदीनवाणी ! ॥ ७ ॥
वाणी सुचे न कविला, नयनांस पाणी ।
येईल कां न असली कथितां कहाणी ? ।
वाग्देवते ! सदय तूं अससी शहाणी ।
संबोधनार्थ मज दे मृदु गोड वाणी ॥ ८ ॥

१ हे वाग्देवि.

प्राणी समान अवघे सुखदुःखभागी ।
लोकीं सनातन असें सुख कोण भोगी ? ।
नाहीं कुणीहि न जयास कधींहि दुःख ।
सूर्यासही उदय अस्त सदैव देख ॥ ९ ॥
होता धनंजय जिचा श्वशुर प्रतापी ।
श्रीकृष्ण[1] मातुल सुधारस दुःखतापीं ।
वैधव्य त्याहि भगवद्भगिनी-स्नुषेला !
आलें ! अतर्क्य किति हे जगदीश लीला !! ॥ १० ॥
होतात भस्म ह्मणती नग पातकाचे ।
घेतांचि नाम वदनीं रघुनायकाचें ।
पत्नी वियोगहि तया रघुनायकाला ! ।
वैधव्य ये अहह ! तज्जननीत्रयाला[2] !! ॥ ११ ॥
**कृष्णा तारा अहल्या** स्तविलि कविजनीं कीर्ति ज्यांची पुराणीं।
साध्वी **पौलस्त्य**-पत्नी परम शुचिमती **जानकी रामराणी**।
प्रातःकाळीं जयांच्या स्मरति बुध सदा पुण्य नामावलीतें।
त्यांतेंही दुःख झालें अपरिमित पुरा ! कोण वारी विधीतें ? १२
वत्से ! आवर दुःखशोक अधुना पुत्राकडे ह्या पहा ।
देवें हा गमतें प्रसाद दिधला, संरक्षणातें महा ।
जे जे यत्न मनीं यथार्थ दिसती योजून ते वाढवा ।
होतां पुत्र सुधी पराक्रमपटू मातेस ये वाहवा ॥ १३ ॥
वर्षीं पंचम सप्तमींच दशमीं एकादशीं वा जयां ।
ये वैधव्य, मिळे न अन्न पुरतें कीं वस्त्र नेसावया ।

१ पाठ दुसरा—श्रीकृष्ण मातुल पतीस सुधाच तापीं.
२ कौसल्या, सुमित्रा, व कैकयी यांना.

ज्यांतें तच्छ्वशुरादि सांगति करूं तें ब्रह्मचर्यव्रत ! ।
दुर्दैवाहत बालिका कितितरी ह्या भारतीं सांप्रत ! ॥ १४ ॥

अकरुण हृदयांनीं शास्त्रविद् कर्मठांनीं ।
खडतर नियमांनीं सत्यमिथ्या व्रतांनीं ।
किति निज भगिनी ह्या नाडिल्या आर्यबाला !
बघुन असुख त्यांचें खिन्नता ये मनाला ! ॥ १५ ॥

द्याया सहाय्य अपुल्या भगिनी-जनांतें ।
शक्ती असे प्रभुवरें दिधली तुह्मांतें ।
तीचा करा सुविनियोग; जशी अहल्या ।
जोडी सुकीर्ति तसलीच बरा अमूल्या ॥ १६ ॥

पाषाणतुल्य हृदयें जरि कर्मठांचीं ।
दुःखें सदा द्रवति देखुनि आत्मजांचीं ।
आर्तस्वरा निरखितां दुहिता स्वकीया ।
त्या कर्मठांसहि फुटे हृदयांत माया ! ॥ १७ ॥

माया दया न च जयां गतभर्तृकांची ।
आख्यायिका कथिति जे विविधा स्मृतींची ।
ज्यांच्या स्मृतींत न कृतींतहि मेळ कांहीं ।
ते मानवाधम, तिथें परमार्थ नाहीं ! ॥ १८ ॥

तयां धिग् ! धिग् ! धिग् ! ज्यां बघुनि नयनीं बालविधवा ।
दया माया चित्तीं उपजत न जेवीं मृत शवा ।
जळो त्यांची विद्या ! धुळिसहि मिळो पंथ असला ॥
जिथें अन्यायाचा अनुचर रुढी—देव शिरला ॥ १९ ॥

मनूचे ते कानू नसति रुधिरीं सत्य लिहिले ।
अह्मीं स्वार्थी विप्रीं कितिक भलते श्लोक रचिले ॥

किती अर्थी केली उलटसुलटी ती फिरवणी ।
द्विजा[1] सिंहस्थीं कीं अनुदिन असावी परवणी ॥ २० ॥
अहा ! सत्ता गेली ! परजन मिळाले घरधणी ।
अतां सिंहस्थांची अटपलि अह्मांला परवणी ! ।
शिकावी ती प्रज्ञा अझुनि शिकवावी परजनीं ।
अह्मांला कां व्हावें निज अपयशाचे घरधणी ! ॥ २१ ॥
जयांनीं स्वप्नींही नच निजकरीं शस्त्र धरिलें ।
जयां अग्न्यस्त्राची गति कृति कशी हें नुमजलें ॥
जयांचें क्षात्रत्व प्रचुर वचनीं मात्र उरलें ।
द्विजां धिग् ! धिग् ! जेथें असति असलीं क्षात्रिय कुलें ॥२२॥
न वाणिज्या वाणी करिति परदेशाधिगमन ।
युरोपीं वा द्वीपीं इतर फिरणें जेविं वमन ॥
जयां वाटे मोठें अघजनक नौकाधिगमन ! ।
विदेशी व्यापारी सहज हरिती भारतधन ॥ २३ ! ॥
कर्तव्यास चुके द्विजाति ह्मणुनी तूं काय या भारतीं ।
मर्यादा त्यजुनी जनांस छळिसी हे ! अंतका दुर्मती ? ॥
पूर्वी पाठविसी स्वसैन्य पुढती घेऊन शुभ्र ध्वजा ।
वृद्धांतें कथण्यास कीं " जरठ हो ! संसारलोभा त्यजा" २४
आतां वागसि कां न सांग ? न तुझ्या कां लाज वाटे मना ।
न्याया बालवयस्क पुत्रयुवती ? ही दुष्ट कां वासना ॥
व्याधिग्रस्त किती तुला अठविती, ये अंतका रे त्वरें ॥
ऐसें प्रार्थिति नित्य त्यांस न कसा तूं भेटसी आदरें ॥२५॥
झाला काय विवेक-विभ्रम तुला ? वेडावलें मस्तक ।
वार्धक्यें ? तव चित्रगुप्त थकला कीं भागला लेखक ? ॥

१ ब्राह्मण, क्षात्रिय आणि वैश्य.

विद्वान् भारतभू-विभूषण अशां तारुण्ययुक्तां नरां ॥
नेसी भारतभूमिकेंतुनच कां तूं आपुल्या मंदिरा ? ॥ २६ ॥
नव नव तव दूतीं ग्रंथिरोगादिकांहीं ।
भरतवसुमतीही पीडिली गांजिलीही !॥
असासि पति कृतांता ! दक्षिणेचाच सत्य ।
ह्मणुनि रुचति कीं हे बुद्धिमान् दाक्षिणात्य ! ॥ २७ ॥
तूं दक्षिणेचाच जरी अधीश ।
ह्या दाक्षिणात्यां सुख दे विशेष ॥
अन्याय मार्गें जरि भूप चाले ।
राजा असें कोण तयास बोले ? ॥ २८ ॥
प्रजास जो रंजवि तोच राजा ।
जो पीडितो तो न रुचे समाजा ॥
होतां प्रजा रुष्ट पुढें विनष्ट ।
साम्राज्य होतें ! ह्मणतात शिष्ट ॥ २९ ॥
दुष्कर्मं करिती प्रजांस छळिती साधूंस जे पीडिती ।
स्वातंत्र्या हरिती गुलाम करिती स्वार्थींच ज्यांची मती ॥
ऐसे दुर्जन ह्या महीवरि कुणी जे जे तुला भासती ! ।
त्यांतें भेट सुखें गृहास तव ने त्यांची करी संगती ॥३०॥
नच कधिं इतरांला पीडिलें गांजिलें वा ।
कधिं नच परक्यांचा मांडिला द्वेष हेवा ॥
निज-पर-जन भेदा मानिलें नैव चित्तीं ।
ह्मणुनि अनिश आह्मी भोगितों कीं विपत्ती ? ॥ ३१ ॥
जनपद न परांचा घातला दास्यबंधीं ।
परजन—सुयशातें निंदिलें न प्रबंधीं ॥

परविषय हरूं हें आणिलें नैव चित्तीं ।
ह्मणुनि अनिश येथें धाडिसी कीं विपत्ती ? ॥ ३२ ॥
विरम विरम आतां अंतका ? सानुरागें ।
त्यजुनि भरतभूमी जाय अन्यत्र वेगें ॥
अवचित न पुनः या भारतीं सैन्य धाडीं ।
धवल तव पताका पाठवावी अघाडी ॥ ३३ ॥
अबल सकल आह्मी जाहलों फार दीन ।
भरत–वसुमतीचे पुत्र सद्भाग्यहीन ।
विरम विरम आतां आवरीं स्वीय सेना ।
सदयहृदय देवावीण वाली असेना ॥ ३४ ॥
अदयहृदय तूतें बोलती लोक अन्य ।
सदयहृदय आर्यां भाससी तूं वदान्य ।
प्रबल अबल तूतें सारखे धर्मराजा ।
स्वगण सकल संगें घे तुझ्या मंदिरा जा ॥ ३५ ॥
जातांना निजमंदिरास अमुची ही ऐक अभ्यर्चना ।
देईं दुःख असें पुनः न कधिंही ह्या भारतस्थां जनां ।
चोरांनीं लुटितां नृपा विनवितों; रायें परेशाप्रती,[१]॥
धाडी संकट धर्मराजच तरी मागूं कुठें सद्गती ? ॥ ३६ ॥
नेला जो युवराज दिव्य भुवनीं लाभो ! तया सद्गती ।
वाढो ! तत्सुत–सुप्रताप महिमा शुक्लेंदुवद् भारतीं ॥
सेवो ! संतकथा—सुधोद्भव—सुखा सानंद पद्मावती ॥
मागूं हेंच अतां पदीं नमुनियां देवाधिदेवाप्रती ॥ ३७ ॥

---

१ राजानें छळिलें किंवा लुटिलें. तर परमेश्वरास शरण जातों.

८

# अहल्याबाई आणि मुक्ताबाई.

अर्वाचीन काळीं आमच्या देशांत अहल्याबाई होळकरीण ही एक विख्यात साध्वी होऊन गेली. हिचें चरित्र फारच चित्तवेधक आहे, व हिची सत्कीर्ति आजपर्यंत भरतखंडभर गाजत आहे, हें सर्वप्रसिद्ध आहे. हिला मुक्ताबाई (मंछाबाई) नांवाची एक कन्या होती. मुक्ताबाई भर तारुण्यदशेंत येतांच तिचा पति निवर्तला. पतीसमागमें सहगमन करण्याचा मुक्ताबाईनें निश्चय केला; त्या वेळीं, तिनें सती न जावें ह्मणून तिला अहल्याबाईनें विनंतिपूर्वक केलेला बोध, व त्याजवर मुक्ताबाईनें दिलेलें प्रत्युत्तर, ह्यांचें पुढील पद्यांत वर्णन आहे.

### वृत्त-साकी.

**अहल्याबाई ह्मणतेः—**

" सोडी सोडी सोडी वेडे व्यर्थ दुराग्रह सोडी ! ।
भूलोकीं ह्या करुनि सत्कृती कीर्ति अखंडित जोडी ॥ १ ॥
तुजविण जिवलग कोण सखे ! मज ? कोण प्रियतम अन्य ?।
धरुनि निजमनीं सौजन्यातें वचन करी मम मान्य ॥ २ ॥
इंदुमुखी ! तव चंदनशीतल सुंदर कोमल काया ।
हर ! हर ! मुग्धे ! दग्ध करूनी दुखविशि जीवा कां या ? ३
हत्ती घोडे रत्नभूषणें देइन तुजला बाळे ! ।
दासी होउन राहिन तव मी, जाउं नको वेल्हाळे ! ॥ ४ ॥
पुरविन सर्व मनोरथ तव हें देइन राज्य तुला मी ।
इंदुरनगरीं इंदुमुखी ! तूं राही सुंदर धामीं ॥ ५ ॥
नाजुक कोमल काया तव जैं अरुणरश्मिनें तापे ।
सोशिल कैशी पावकतापा ? हृदय सखे ! मम कांपे ! ॥६॥

हंत ! हंत ! गे कृतांत तुजला वाटे कसा पसंत ! ।
आत्मघात अति अनुचित ह्मणती लोकीं संत महंत ॥ ७ ॥
ईशें दिधला देह न त्याचा आपण नाश करावा ।
आत्मघात कां करुनि निजशिरीं पातकपर्वत घ्यावा ? ॥८॥
अभिमन्यूची सुंदर ललना प्रियपतिविरहा सोशी ।
सहगमनातें न करीं ऐसें कृष्ण तिला उपदेशी ॥ ९ ॥
आठिव निजमनिं सर्व सखे ! तें कलियुगकाळिं तशांत ।
सहगमन श्रेयस्कर ह्मणति न साधू सज्जन संत ॥ १० ॥
तुजविण वत्से ! मुक्ते ! ऐशी हांक कुणातें मारूं ? ।
हर ! हर ? कैशी राहुं एकटी ? कैसें दुःख निवारूं ? ।११।
कोण सखे ! प्रिय मंजुळ वचनीं मच्चित्ता रिझवील ? ।
कोण तुझ्याविण मम हृदयांतिल दुःखाग्नी विझवील ? ।१२।
आला दाटुन कंठ सखे ! मम नेत्रीं अश्रु वहाती ।
व्याकुळहृदया झालें, घेशी अपमृत्यू कां हातीं ?" ॥१३॥

मुक्ताबाई ह्मणतेः—

" जननी ! मज तूं उपदेशिसि तें यथार्थ आहे सारें ।
परि असती ह्या मृत्युलोकिंचे व्यर्थचि सर्व पसारे ! ॥१४॥
टाकुनि गुंतविशी मज कांगे ? मोहजालमय पाशा ।
प्रियपति टाकुन ठेवूं कैशी ? वित्तसुखावर आशा ॥ १६ ॥
देशी मज जरि राज्यपद तरी कोणासंगें भोगूं ? ।
पतिविण सांगे कोणासंगें सुखदुःखास विभागूं ? ॥ १६ ॥
पति स्त्रियांचें उत्तम दैवत पतिच्या ठायीं प्रेम ।
ठेउन अनुदिन तत्पदसेवा करणें हा सतिधर्म ॥ १७ ॥
ऐसें उपदेशिसीं पुरा मज, काय नसे तुज ठावें ? ।
आतां जननी ! कसें तुवां हें तद्विपरीत वदावें ? ॥ १८ ॥

पावकताप सुदुःसह ऐशी धरिशी कां तूं भीती ? ।
आर्यजनांच्या अबला न कधीं पावकतापा भीती ! ॥ १९॥
जन्मुनि उत्तम आर्यकुळीं म्यां सहगमना कां भ्यावें ? ।
पतिसह जाउन सतीपदातें कां न सखे ! मिळवावें ? ॥२०॥
राहिन जरि मी भूलोकीं मज पीडिल न कां अनंग ?!
अहह ! दुःख तें सोसुं कसें जैं भाजिल मदन मदंग ॥२१॥
यास्तव वाटे समुचित मज कीं पतिसह नाकीं[1] जावें ।
प्रियपतिसंगें अमरमंदिरीं[2] आनंदांत बसावें ॥ २२ ॥
नेत्रांतुन तव टपटप गळती अश्रू सखे ! किमर्थ ?।
टाकुं नको मज मायाजाळीं साधूं दे परमार्थ ॥ २३ ॥
जातें स्वर्गीं आनंदानें मग कां होशी खिन्न ! ।
देई मजला अनुमति सदये ! ! होई सखे ! प्रसन्न ॥२४॥
देतिल मजला मान सखे ! त्या वृंदारकगणनारी ।
पाहिन वंदिन नंदननायक विधि माधव मदनारी ॥ २५ ॥
येतें आतां लोभ असूं दे खेद न चित्तीं मानीं ।
प्रियपतिसंगें स्वर्गीं जाइन बैसुन दिव्य विमानीं ! ” ॥२६॥

---

१ स्वर्गीं. २ देवलोकांत.

९

# व्हिक्टोरिया-महोत्सव.

## श्लोक.

जीच्या राज्यीं कधींही बुधजन ह्मणती मावळेना गभस्ती ।
जीची औदार्यकीर्ती निज-पर-जनही सर्व सानंद गाती ॥
त्या व्हिक्टोर्या सतीच्या सुखभरित अशीं पूर्ण पन्नास वर्षें ।
झालीं राज्यास, या, या, स्वजन ! करुं चला आज उत्साह हर्षें ॥ १॥
सद्भाग्यें भारताच्या दिवस उगवला आज आह्मां सुखाचा ।
या, या, उत्साह मांडूं प्रकटित करुं या लोभ अस्मज्जनांचा; ॥
ठायीं ठायीं पताका ध्वज उभवुनियां शोभवूं आर्यभूमी ।
शृंगारूनी गृहांतें सुदिन समजुनी हर्ष मानूं स्वधामीं ॥२॥
दीपांतें पाजळूनी करुनि हरिकथा कीर्तनें गोड गीतें ।
गाऊनी तोषवूं या स्वजन ! झडकरी थोर व्हिक्टोरियेतें ॥
"काळी गोरी प्रजा हे" क्षणभरि न असा भेद चित्तांत आणी ।
प्रत्यक्ष न्यायमूर्ती विमलमति असे आपुली थोर राणी ॥३॥
जीच्या राज्यीं लुटारू ठक अधम अतिक्रूर पेंढार दुष्ट ।
त्यांचे आदीकरूनी सुजनरिपु कुधी सर्व झाले विनष्ट ॥
लोकांतें सौख्यशांती अपरिमित मिळे रामराज्यांत जेवीं ।
जीच्या राज्यांत, तीच्याविषयिं जनमनीं प्रीति कैशी नसावी ?॥४॥

विरोध सारा विसरून गेले ।
हिंदू मुसल्मान् प्रियमित्र झाले ॥
ज्यांत जीच्या न कशी स्तवावी ? ।
हक्टोरिया ती प्रिय कां न व्हावी ? ॥५॥

पाश्चात्य विद्या स्वजनां मिळाली ।
ज्ञानाभिवृद्धी सुविशेष झाली ॥
राज्यांत जीच्या न कशी स्तवावी ? ।
व्हिक्टोरिया ती प्रिय कां न व्हावी ? ॥६॥

सुधारणा फार, तऱ्हेतऱ्हेचीं ।
यंत्रें मनें हर्षविती जनांचीं ॥
राज्यांत जीच्या न कशी स्तवावी ? ।
व्हिक्टोरिया ती प्रिय कां न व्हावी ? ॥७॥

ह्या भारतीं नृप युधिष्ठिर धर्ममूर्ति ।
नीतिप्रवीण बहुसंगरलब्धकीर्ति ॥
झाला पुरा प्रिय जसा निजबांधवांतें ।
व्हिक्टोरिया प्रिय तशीच गमे अम्हांतें ॥८॥

होता युधिष्ठिर परी निजदेशवासी ।
तो आवडे ह्मणुनियां अमुच्या जनांसीं ॥
राज्ञी असून परकी प्रिय फार वाटे ।
आह्मां जनां; नवल ह्यांतच फार मोठें ! ॥९॥

मराठ्यांतें झाली प्रियकर जशी होळकरिण ।
अहल्या सद्वृत्ता, कविजन जिचे गाति सुगुण; ॥
तिच्या ऐशी राज्ञी प्रियकर अह्मां वा शतगुणें ।
तिच्याहूनी वाटे बुधजन असें कोण न ह्मणे ? ॥१०॥

राजा कोण असे जगांत दुसरा ज्याच्या पदांभोरुहीं ।
नाहीं पांच दहा परंतु शतशः राजे सुविख्यातही
आनंदें प्रणती करून ह्मणती " आह्मां तुझ्या स
मोठा तारक मित्र एक न दिसे भूमीवरी पारखा

ऐशी थोर असूनही नच ह्मणे सामर्थ्य माझें असे !
मोठें फार; परंतु नम्र वचनीं सांगे अह्मां गोडसें ॥
कीं—" वाटे मज सौख्यशांति तुमची सामर्थ्य माझें खरें, ॥
तुह्मां पाहुन सुप्रसन्न, गमतें माझ्या मनातें बरें " ॥ १२ ॥

तो पाठवून निजपुत्र इथें कराया ।
सेनापतित्व अमुच्यावर थोर माया ॥
त्वां दाविली, भरंवसाहि तसा अपार ।
आह्मी तुझे न विसरूं उपकार थोर ॥ १३ ॥

आहे पूर्ण जसा अतां भरंवसा प्रीतीहि आह्मांवरी ।
माते ! ठेव तशीच ती अनुदिनीं तूं आपुल्या अंतरीं ॥
आह्मी यत्न करूं तुझ्या उपकृती फेडावयातें सदा ।
कल्याणार्थ तुझ्या सदा प्रभुवरा प्रार्थूं यशस्सौख्यदा ॥ १४ ॥

ईशा ! ठेव सुखी सदा प्रणयिनी व्हिक्टोरिया श्रीमती ।
कन्या पुत्र तिचे प्रपौत्रहि तसे सेवोत सौख्याप्रती ॥
आधिव्याधि नसो, प्रजाजन-मनीं सद्राजभक्ती वसो ! ।
राज्यातें परचक्रभीति न कधीं व्हिक्टोरियेच्या असो !॥ १५ ॥

वाढे शुक्लशशी जसा प्रतिदिनीं वाढो सुमत्ता सदा ॥
राज्ञीची पृथिवीवरी निजजनां जी भासते सौख्यदा ॥
शत्रूंचें दळ ऐकुनी विजयिनीनामास दूरी पळो !॥
[illegible] निर्मल कीर्तिदीप सगळ्या भूमीवरी पाजळो! ॥ १६ ॥

[illegible] टळो ! प्रजाजन वळो ! सन्यायमार्गीं, जळो ! ।
[illegible]द्रोह समूळ दूर अवघी दुर्भिक्ष्यबाधा पळो ! ॥

भूपालांस तसें प्रजांस अपुलें कर्तव्य सारें वळो !।
कीर्तिश्रीसुख सर्वदा विजयिनी व्हिक्टोरियेतें मिळो !॥ १७॥

REFBK-0001321
REFBK-0001321



१ हें काव्य महाराणी व्हिक्टोरिया यांच्या १८८७ मधील ज्यूबिली महोत्सवानिमित्त कवीनें रचिलें होतें. या काव्याच्या इंग्रजी भाषांतराच्या प्रती कवीनें महाराणी व्हिक्टोरिया यांच्याकडे पाठविल्या [illegible] महाराणीसाहेबांना अत्यंत आवडल्या असून त्याबद्दल त्यांना [illegible] त्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी जनरल सर हेनरी पॉन्सोन्बी ह्यांच्या [illegible] पत्र पाठवून त्यांचे आभार मानिले होते.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | शुद्ध. | अशुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | ७ | विविधपुरीचें | विविधपुरीचे |
| ४ | ९ | हालवायी | हलवायी |
| ४ | १६ | हेम नगांनीं | हेमनगांनीं |
| ४ | २३ | परि | परी |
| ६ | ६ | वटोदराधिपति | वटोधराधिप |
| ६ | ९ | यईल | येइल |
| ६ | ११ | जॉर्जभूपति | जॉर्जभूपती |
| ७ | १४ | वाङ्माधुर्यें | वाङ्माधुर्यें |
| ८ | ३ | व्रजजिवनसुत | व्रजजीवनसुत |
| ८ | २० | वधुं | वघुं |
| ८ | २१ | मझरूल | मझरुल |
| ८ | २२ | हक्क समान | समान हक्क |
| १० | २० | एका मागून | एका मागुन |
| १३ | २ | यदूहृदयीं | यद्‌हृदयीं |
| १६ | ७ | लक्षावधि | लक्षावधी |
| १६ | १२ | वाढवाया | वाढावया |

१६ ग्याना ( हा ग्यानबा न्हावी ना. समर्थ, ना. चौबळ, रा. ब. जोशी न्या. सर चंदावरकर, प्रधान वकील, रा. रा. जी. एस्. राव, यांच्या येथें हजामतीस जात असे. त्याला न्हाव्यांची सभा भरवि- ांहि सूचना केली होती. म्हणून त्यानें कवीजवळ सर चौकशी केली होती.)

| | २ | वसिष्ट | |
|---|---|---|---|
| | १७ | ह्मणें | |

9327



| | | | |
|---|---|---|---|
| २६ | ६ | किती | किति |
| २७ | १६ | ख्याती | ख्याति |
| २८ | ४ | पात्राता | पात्रता |
| २८ | ५ | येईल | येइल |
| ३० | १४ | सत्कृतींचे | सत्कृतीची |
| ३३ | १५ | स्वगृहिं | स्वगृहीं |
| ३४ | २० | मिरविति | मिरविती |
| ३५ | ३ | दगडाहुनहि | दगडाहूनहि |
| ३५ | १९ | सदुगुण | सद्गुण |
| ३५ | २० | होईल | होइल |
| ३६ | १३ | तेहतीस | तेह्तीस |
| ३६ | १७ | ह्मणुनि | ह्मणुनी |
| ३६ | २१ | पंचवत्क | पंचवक्त्र |
| ३७ | ५ | मम | मग |
| ३९ | ७ | कंचूकी | कंचुकी |
| ४३ | ९ | साहाय्य | सहाय्य |
| ४५ | ६ | होऊन | होउन |
| ४५ | ९ | बंधजना | बंधुजना |
| ४६ | १५ | काववय गाजा | कविवर्य गाजी |
| ४७ | ६ | पारांगत | पारंगत |
| ४७ | १७ | निजबांधवाची | निजबांधवांची |
| ४८ | २ | अजनाम | रघुनाम |
| ४८ | १३ | अभिघा | अभिधा |
| ४८ | १८ | मथित | प्रथित |